कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १९ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹

## चकमकीत नक्षलवादी हिडमा ठार

**आंध्रप्रदेश :** आंध्र प्रदेशातील जंगलात कुख्यात नक्षलवादी हिडमा चकमकीत ठार झाला. हिडमाच्या खात्म्यासाठी शाहांनी सुरक्षा दलांना ३० नोव्हेंबरचा अल्टमेटम दिला होता. मात्र, या अल्टीमेटमच्या १२ दिवस आधीच ही मोठी कारवाई पूर्ण करण्यात सुरक्षादलांना यश मिळाले. छत्तीसगडच्या नक्षल प्रभावीत भागातील शेजारील राज्यांना लागून असलेल्या सीमेवर मंगळवारी सकाळपासूनच डीआरजीचे जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक सुरू होती. या चकमकीत काही नक्षलवादी मारले गेले. या नक्षलवाद्यांमध्ये माडवी हिडमा आणि त्याच्या पत्नीचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. या चकमकीमध्ये हिडमा आणि त्याच्या पत्नीसह एकूण सहा नक्षलवादी मारले गेले आहेत.

इलेक्ट्रीशिअन पाहिजे

साई-इन हॉटेल, मुक्काम चोंढी, अलिबाग रेवस रोड येथे इलेक्ट्रीशिअन पाहिजे. सुस्वभावी, निर्वसनी. अर्जासह समक्ष भेटा




# महाविकास आघाडीतर्फे प्रचाराचा शुभारंभ

## श्री काळंबादेवीचे दर्शन घेऊन प्रचाराला अलिबागमध्ये सुरुवात





(छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या थेट नगराध्यक्ष व नगरसेवक पदाच्या उमेदवारीसाठी शेकाप, काँग्रेस, महाविकास आघाडीचे उमेदवार रिंगणात उतरले आहे. अलिबाग शहरातील श्री काळंबादेवीचे दर्शन घेऊन महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी प्रचाराला सुरुवात केली. नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक यांच्यासह नगरसेवकपदाच्या उमेदवारांनी मंगळवारी सायंकाळी प्रचाराचा शुभारंभ नारळ वाढवून केला. रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रचार सुरू झाला. या प्रचारामध्ये महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अलिबाग नगरपरिषदेच्या थेट नगराध्यक्ष पदासाठी अक्षया प्रशांत नाईक, नगरसेवक पदासाठी प्रभाग एकमधून संतोष मधुकर गुरव, संध्या शैलेश पालवणकर. प्रभाग दोनमधून सुषमा नित्यानंद पाटील, प्रशांत मधुसूदन नाईक. प्रभाग तीनमधून साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील, प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे. प्रभाग पाचमधून निवेदिता राजेंद्र वाघमारे, समिर मधूकर ठाकूर. प्रभाग सहामधून ऋषीकेश रमेश माळी, अश्विनी ठोसर. प्रभाग सातमधून ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर. प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे, अनिल चोपडा. प्रभाग नऊमधून योजना प्रदिप पाटील, सागर शिवनाथ भगत. प्रभाग दहामधून शैला शेषनाथ भगत, वृषाली महेश भगत हे

•➤पान २ वर

## दिल्लीतील कोर्ट, शाळा उडवण्याची धमकी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटानंतर आता पुन्हा दिल्लीतील साकेत न्यायालय, पटियाला हाउस, तीस हजारी आणि रोहिणी न्यायालयांना बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. धमकी मिळताच चारही परिसरांमध्ये सुरक्षा कडक करण्यात आली असून कॅम्पसची तपासणी सुरू आहे. दिल्लीतील चार न्यायालयांव्यतिरिक्त दोन सीआरपीएफ शाळांनाही बॉम्बस्फोटाची धमकी देण्यात आली आहे. यामध्ये द्वारका आणि प्रशांत विहार येथील शाळांचा समावेश आहे.

न्यायालय परिसरांना पाठवलेल्या धमकीच्या संदेशात स्पष्टपणे सांगितले आहे की न्यायालय कॅम्पसमध्ये स्फोट होऊ शकतो. लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटानंतर सुरक्षा यंत्रणा अशा कोणत्याही धमकीला हलक्यात घेत नाहीत. म्हणून माहिती मिळताच सर्व कॅम्पसमध्ये तीव्र तपासणी सुरू करण्यात आली आहे. हा ई-मेल जैश-ए-मोहम्मदच्या नावाने पाठवण्यात आला आहे. त्यामुळे पोलिसांनी तपास सुरु केला आहे. ही धमकी आणखी गंभीर मानली जात आहे. ज्या पटियाला हाउस कोर्टला बॉम्बस्फोटाची धमकी पाठवली गेली आहे, तिथे दिल्ली स्फोटातील आरोपीला हजर करण्यात आले.

### लोकांमध्ये दहशत

१० नोव्हेंबरच्या संध्याकाळी दिल्लीतील उच्च सुरक्षा क्षेत्र लाल किल्ल्याजवळ कारमध्ये झालेल्या मोठ्या स्फोटात १३ लोकांचा मृत्यू झाला होता, तर सुमारे २० जण जखमी झाले होते. हा एक दहशतवादी हल्ला होता. या हल्ल्याचा संबंध जम्मू-काश्मीर, फरिदाबाद आणि उत्तर प्रदेशातील पांढरपेशा संशयित दहशतवादी डॉक्टरांशी आहे. या स्फोटानंतर दिल्लीतील लोकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. दिल्लीसह प्रत्येक राज्यात सुरक्षा कडक करण्यात आली असून दहशतवादी मॉड्यूलचा भांडाफोड करताना प्रत्येक कानाकोपऱ्यात तपास सुरू आहे.

## वेधक

### शिक्षकांसह विद्यार्थ्यांना सूचना

**रायगड :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय शैक्षणिक सहलींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अशा सहलीदरम्यान सुरक्षितता, शिस्त व नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. समुद्रकिनाऱ्यांवर शैक्षणिक सहली येत असतात. या विद्यार्थांना समुद्रात उतरण्यापूर्वी कोणती खबरदारी घेणे आवश्यक आहे, याबाबतचा सूचना फलक समुद्रकिनाऱ्यावर लावण्यात येणार आहेत. समुद्रकिनारी सहलीसाठी आल्यानंतर विद्यार्थ्यांना पाण्यात उतरण्यास मनाई असणार आहे. शिक्षक व सहलीतील मार्गदर्शकांना जबाबदाऱ्या सोपवण्यात येऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य दिलेले असावे, असे सांगण्यात आले आहे.

### धावती मुंबई मंदावली!

**मुंबई :** चेंबूरच्या आरसीएफ कंपाऊंडजवळ गेल पाइपलाईनमध्ये झालेल्या गळतीमुळे मुंबईतील सीएनजी गॅस पुरवठा विस्कळीत झाला. रविवार दुपारपासून मंदावलेला गॅस पुरवठा दुसऱ्या दिवशीही पूर्ववत न झाल्याने टॅक्सी, रिक्षा आणि बेस्टच्या बसगाड्यांनाही गॅस मिळणे बंद झाले. त्यामुळे मुंबईची वाहतूक सेवा पुरती कोलमडली. रिक्षा, टॅक्सीसाठी तासन्तास वेटिंग, बसच्या कमतरतेमुळे प्रचंड गर्दीने मुंबई अक्षरशः मंदावली. परिणामी मुंबईकरांचे हाल झाले. आरसीएफ कंपाऊंड येथील गेलच्या मुख्य गॅस पाईपलाईनमध्ये रविवारी दुपारी बिघाड झाला. त्यामुळे संपूर्ण मुंबईभरात सीएनजी मिळणे मुश्कील झाले. याचा मोठा परिणाम सोमवारी दिसून आला. शाळेत जाणाऱ्या मुलांना रिक्शा, टॅक्सी मिळणे मुश्कील झाले.

## वाडगांवमध्ये निधीत भ्रष्टाचार

### शासकीय निधी वापरात अफरातफर केल्याचा आरोप

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

वाडगाव येथील रसानी टेकडी येथील दत्तमंदिर यात्रा स्थळांच्या विकासाचा निधी वाडगांवमधील हनुमान मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉकच्या बांधकामासाठी वर्ग करण्यात आला. प्रत्यक्षात मात्र कोणतेही काम करण्यात आले नाही, असा आरोप दत्त मंदिर ट्रस्ट अध्यक्ष, सदस्य व वाडगाव ग्रामस्थ यांनी केला असून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे.

दत्त मंदिर ट्रस्टी, ग्रामस्थ मंडळी यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, खासदार सुनील तटकरे यांच्या मार्फत जिल्हा नियोजन समितीच्या कोट्यातून रसानी टेकडी येथील श्रीदत्त मंदिर यात्रा स्थळांचा विकास अंतर्गत निधी मंजूर केला होता. आरओ प्लांट बसवून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी हा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र या कामाच्या नावामध्ये परस्पर बदल करण्यात आला. वाडगाव येथील हनुमान मंदिर परिसरात भाविकांच्या वाहनांसाठी पेव्हर ब्लॉकचे बांधकाम करण्यासाठी निधी वर्ग करण्यात आला. कर्जत येथील बेरोजगार अभियंता, ठेकेदार शुभम शिर्के यांच्या नावे काम मंजूर करण्यात आले. दहा लाख, ५० हजार रुपये ठेकेदाराला देण्यात आले असल्याचे त्यांना समजले. दत्त मंदिर ट्रस्टच्या मागणीनुसार, हे काम दत्त मंदिर परिसरात पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी मंजूर झाले होते. दत्त मंदिराच्या विकासासाठी मंजूर झालेला निधी हनुमान मंदिर परिसरातील वर्ग करूनदेखील कोणतेही काम केले नाही. मात्र लाखो रुपयांच्या निधीमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

हनुमान मंदिर येथे देखील कोणतेही काम सद्यस्थितीत झालेले दिसत नाही. त्यामुळे या कामांची चौकशी करून तातडीने स्थळ पंचनामा करून भ्रष्टाचार करणाऱ्याविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ट्रस्ट अध्यक्ष, सदस्य आदींनी केली आहे.

## मुरूडमध्ये राजकीय भूकंप!

### माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील यांचा अर्ज बाद

### भंडारी समाजात तीव्र नाराजी, शिवसेनेवर उलटला बुमरँग



**। मुरुड । विशेष प्रतिनिधी ।**

मुरुड नगरपालिकेच्या निवडणूक प्रक्रियेत मोठा राजकीय धक्का बसला असून, दोन वेळा नगराध्यक्षपद भूषवलेल्या शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्या स्नेहा किशोर पाटील यांचा उमेदवारी अर्ज छाननीदरम्यान बाद ठरला आहे. यामुळे मुरुडच्या राजकारणात खळबळ माजली असून भंडारी समाजात नाराजी उसळली आहे.

#### शिंदे गटाचा उमेदवार बाद

याचवेळी आमदार दळवी यांनी कल्पना पाटील यांनाही उमेदवारी दिल्याची माहिती बाहेर आली. त्यामुळे शिवसेनेच्या गोटात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यातच छाननीवेळी स्नेहा पाटील यांचा अर्ज एबी फॉर्म संदर्भातील तांत्रिक कारणावरून बाद ठरवल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे.

#### भंडारी समाजात संताप

मुरुडच्या राजकारणात भंडारी समाज निर्णायक मानला जातो. या समाजचा स्नेहा पाटील यांना ठाम पाठिंबा होता. त्यांच्या बाद झाल्याने भंडारी समाजात तीव्र नाराजी पसरली असून हा राग थेट मतदानात व्यक्त होण्याची शक्यता आहे. यामुळे शिवसेनेला केवळ नगरपरिषदच नव्हे, तर आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये देखील त्याची मोठी किंमत मोजावी लागू शकते, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. परिणामी, मुरुडमधील आगामी राजकीय समीकरणे काय वळण घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

#### ‘स्ट्रॅटेजी की’ राजकीय काटा?

**मुरुडमध्ये सर्वाधिक अनुभव असलेली आणि नगरपालिकेचा कारभार दोन वेळा सांभाळलेली एकमेव नेत्या असतानाही स्नेहा पाटील यांचा अर्ज बाद ठरविण्यात आल्याने हा निर्णय ‘काटछाटीचा डाव’ म्हणून पाहिला जात आहे.**

स्नेहा पाटील यांनी मागील निवडणुकीत प्रथमच मुरुड नगराध्यक्षपद शिवसेनेच्या हाती आणताना महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. कणखर नेतृत्वामुळे त्यांना शहरात मोठा जनाधार असून आ. दळवी यांच्याच आग्रहावरून त्यांनी पुन्हा उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या अर्ज दाखलवेळी भंडारी समाजासह मोठा समर्थक वर्ग उपस्थित होता.

## मार्चअखेर हापूसचे आगमन

### पावसामुळे फटका, बागायतदारांचा अंदाज

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

पावसाळा लांबल्यामुळे त्याचा परिणाम आब्यांवर झाला आहे. त्यामुळे फेब्रुवारीत येणारा आंबा यंदा मार्च महिन्याच्या अखेरीस येणार असल्याचा अंदाज आंबा बागायतदारांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे खवय्यांना हापूस आंब्यासाठी यंदा प्रतीक्षा करावी लागणार आहे.



> आंब्यासाठी पोषक असणारा ईशान्यकडून वारा येतो, तो यंदा पावसामुळे उशिराने सुरू झाला आहे. एक महिना उशिराने पोषक वातावरण होणार असल्याने आंबा तयार होण्यास वेळ लागणार आहे.
> – **सचिन लांजेकर,** आंबा बागायतदार, रत्नागिरी.

एपीएमसी मार्केटमधील फळ मार्केट देशातील आंब्याची सर्वात मोठी बाजारपेठ आहे. या बाजारात फक्त कोकणच नाही, तर जगभरातून आंबे दाखल होतात. ही कोकणातील आंब्याच्या विक्रीची मोठी बाजारपेठ आहे, पण यंदा पावसाळा लांबल्यामुळे तसेच थंडीला उशिरा सुरुवात झाल्याने आठवडाभर कोकणासहीत ग्रामीण महाराष्ट्रात गारवा निर्माण झाला आहे.

•➤पान २ वर

## पीक विम्यासाठी शेतकऱ्यांचे उपोषण

- **बैठकीनंतरही शेतकऱ्यांच्या पदरी निराशा**
- **उपोषणात सहभागी होण्याचे आवाहन**



**। तळा । प्रतिनिधी ।**

आंबा पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात वितरित न झाल्यामुळे तळा तालुका शेतकरी संघटनेतर्फे तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्याचे खासदार सुनील तटकरे यांच्याजवळ तळा तालुका शेतकरी संघटना यांच्या वतीने पीक विम्याबाबत पत्र व्यवहार केला असता त्यांनी कृषि मंत्री दत्ता भरणे यांच्या मंत्रालयाच्या दालनात बैठक घेतली होती. या बैठकीला कृषि आयुक्त, जाइंट डायरेक्टर, रायगड जिल्हा कृषि अधीक्षक तसेच विमा कंपनीचे प्रतीनिधी हजर होते.

या बैठकीच्या दरम्यान कृषि आयुक्त, जाइंट डायरेक्टर तसेच विमा कंपनीचे प्रतीनिधी यांनी संगितले की, नोहेंबरच्या ५ तारखेपर्यंत पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात वितरित होईल. मात्र १८ नोव्हेंबर उजाडला तरी कोणत्याही शेतकऱ्याच्या खात्यामध्ये पैसे वितरित झाले नाही.

यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून विमा कंपनीने आपला शब्द न पाळल्यामुळे विमा कंपनीच्या विरोधात तळा तालुका शेतकरी संघटना बुधवारपासून (दि.१९) तळा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार आहेत. या उपोषणात तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.

## चेष्टा मस्करीतून तरुणावर चाकूने वार

### नागोठण्यातील घटनेने खळबळ

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

चेष्टा मस्करीचे रूपांतर भांडणात झाल्याने नागोठण्यातील मशीद मोहल्ला येथील झोहेब अनिस अधिकारी (वय ३१) या तरुणाने नागोठण्यातीलच हुजरा मोहल्ला येथील अरबाज आयूब पानसरे या २६ वर्षीय तरुणावर चाकूने हल्ला करून त्याच्या शरीरावर नऊ ठिकाणी सपासप वार केले.

या हल्ल्यात अरबाज पानसरे हा तरुण गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. ही घटना नागोठणे रिलायन्स सर्कल अरबाज पानसरे या तरुणाच्या मोटारसायकल गॅरेजमध्ये दुपारी १२.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्यातून उपलब्ध माहितीनुसार अरबाज पानसरे या तरुणाच्या अकबर ऑटो गॅरेजमध्ये कामानिमित्त आलेला झोहेब अधिकारी हा अरबाज याची चेष्टा मस्करी करीत होता. त्यावेळी चेष्टा मस्करी व भांडण करू नकोस, असे अरबाज हा झोहेब याला बोलला. त्या गोष्टीचा राग मनात धरून आरोपी झोहेब याने अरबाज याला तुला ठार मारून टाकतो, अशी धमकी देऊन अरबाज यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने

•➤पान २ वर

### वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत ३० ते ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या अपघात प्रकरणी वाहन चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवारी मध्यरात्री तीनच्या सुमारास महिंद्रा शोरूम समोरील पुणे-मुंबई हायवेवर ३० ते ३५ वर्षीय अनोळखी इसमाला अज्ञात वाहनाने धडक दिली. आणि अंगावरून गाडी गेली. या अपघातात तो जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### मेट्रोच्या कामादरम्यान कर्मचाऱ्याचा मृत्यू

**मुंबई :** मेट्रो ९ मार्गिकेच्या कामादरम्यान दुर्घटना आणि अपघातांची मालिका सुरूच आहे. मिरारोडच्या साईबाबा नगर येथे कामादरम्यान एका कर्मचाऱ्याचा पडून मृत्यू झाला. याप्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सुरक्षा व्यवस्थेत त्रुटी असल्याचा ठपका ठेवून कंत्राटदाराला ५० लाख रुपये, तर सल्लागाराला ५ लाख रुपये दंड ठोठावला. मृताच्या कुटुंबास एमएमआरडीएकडून तातडीने ५ लाखांची मदत देण्यात आली. मेट्रो स्थानकाच्या कामादरम्यान सुपरवायझर फरहान अहमदने स्थानकावर एका बाजूला पडलेल्या लोखंडी पट्ट्या उचलून नेण्यास कर्मचाऱ्यांना सांगितले. या लांब लोखंडी पट्ट्या उचलून नेताना त्या फरहानच्या दिशेने आल्याने त्या लागू नयेत, यासाठी फरहान मागे झाला आणि त्याचा तोल जाऊन ६५ फुटांवरुन खाली पडला.

## एसटीच्या स्मार्टकार्डची प्रतीक्षा कायमच

### एसटीचे हायटेक कामकाज फक्त कागदावरच | महामंडळाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

- **तीन वर्षांपासून परिवहनची योजना बंद**

**प्रमोद जाधव**

**। रायगड ।**

एसटी महामंडळाने हायटेक होत कागदी पासच्या जागी स्मार्ट कार्डची योजना राज्यात राबविली. मात्र नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे महामंडळाचा कारभार चालला असल्याचे दिसून आले आहे. मागील तीन वर्षापासून ही योजना बंद पडली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह नियमित एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना स्मार्टकार्डची प्रतीक्षा कायमच असून एसटीचे पासचे कामकाज कागदाच्या भरवशावरच चालत आहे.

ज्येष्ठ नागरिकांना एसटीतून प्रवास करताना, तहसील कार्यालयातील मिळणाऱ्या ज्येष्ठ नागरिक दाखल्याच्या आधारे एसटीची सवलत पूर्वी मिळत होती. त्यानंतर आधारकार्डमार्फत सवलत देण्यास सुरुवात केली. मात्र हे कार्ड हाताळताना गहाळ होण्याची भिती अधिक होती. त्यात खराब होण्याची



> स्मार्ट कार्ड योजना केंद्र सरकारकडून सुरू करण्यात आली होती. काही कारणास्तव कार्ड देणे थांबले होते. परंतु लवकरच पुन्हा स्मार्टकार्ड देण्यात येतील.
> – **सुनील चौरे,** विभाग नियंत्रक एसटी महामंडळ, रायगड विभाग

शक्यताही होती. एसटी महामंडळाने ६५ वर्षे पूर्ण असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र म्हणून स्मार्ट कार्ड देण्याचा निर्णय घेतला. बस आगारातील आरक्षण कक्षामध्ये त्यासाठी स्वतंत्र कार्यालय सुरु करण्यात आले. स्मार्टकार्ड नोंदणी केल्यानंतर एक ते दोन महिन्यानंतर स्मार्टकार्ड देण्याची व्यवस्था करण्यात आली. एसटी महामंडळाच्या या उपक्रमाला ज्येष्ठ नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एसटीचे स्मार्टकार्ड दाखवून ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध झाली. तसेच एसटीतून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसह अन्य पासधारक प्रवाशांनादेखील स्मार्टकार्ड देण्यास सुरुवात केली. कागदी पासच्या जागी स्मार्टकार्ड आल्याने विद्यार्थी व अन्य प्रवासीदेखील आनंदी झाले. आठ वर्षापूर्वी सुरु झालेली स्मार्टकार्ड योजना गेल्या तीन वर्षापासून बंद पडली आहे. ज्या कंपनीला स्मार्टकार्ड तयार करण्याचे काम दिले होते.

•➤पान २ वर

## मोखाड्याजवळ एसटी अपघातात २५ जखमी

**। मोखाडा । प्रतिनिधी ।**

जव्हारमध्ये एसटीचा भीषण अपघात होऊन ४० जण जखमी झाल्याची घटना ताजी असतानाच मंगळवारी (दि.१८) श्रीघाटात असाच भयंकर अपघात घडला. पालघरहून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने भरधाव निघालेल्या एसटीचालकाचा अवघड वळणावर ताबा सुटला आणि बस रस्त्याच्या कडेला कलंडली. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी २५ प्रवासी जखमी झाले आहेत. यातील तीन प्रवासी गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पालघर आगारातून सकाळी सात वाजता पालघर-वाडा-छत्रपती संभाजीनगर बस नाशिककडे जात होती. ३८ प्रवासी या बसमधून प्रवास करीत होते. पालघरची हद्द संपताच अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या देवगाव फाट्याजवळ बस घाट चढत असताना अवघड वळणावर चालक मधुकर चव्हाण यांचा गाडीवरील ताबा सुटला. त्यामुळे एसटी रस्त्याच्या कडेला कलंडली. अचानक घडलेल्या या घटनेमुळे प्रवाशांमध्ये प्रचंड घबराट उडाली. बसमधील प्रवासी जीवाच्या आकांताने ओरडू लागले. अपघाताचे वृत्त समजताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत प्रवाशांना बाहेर काढले.

### महामार्गावर भीषण अपघात

**मंडणगड :** मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड येथे चालकाचे नियंत्रण सुटलेली कार रस्त्याच्या कडेला खड्ड्यात कोसळली आणि दोघांचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले. जखमींपैकी एकावर मंडणगड येथे उपचार सुरू असून दुसऱ्याला उपचारांसाठी महाड येथे हलविण्यात आले आहे. मुंबईहून मंडणगडकडे येणाऱ्या वॅगनर कार (क्र.एमएच ०८ एएक्स ९५८९) चालकाला झोप लागल्याने रस्त्याच्या कडेला असणाऱ्या खड्ड्यात कार कोसळली. या अपघातात शंकर वसंत करमकर (वय ४६, रा. राजापूर, ता. दापोली) आणि हर्षदा हेरंब जोशी (वय ६८, रा. टिळक आळी, रत्नागिरी) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर प्रमोद मुकुंद लिमये (वय ६५)

•➤पान २ वर

पान १ वरून

## महाविकास आघाडीतर्फे प्रचाराचा शुभारंभ

महाविकास आघाडीचे उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहे. शेकाप, काँग्रेससह महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी मंगळवारी(दि.१८) अलिबागमध्ये प्रचाराला सुरुवात केली.थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया प्रशांत नाईक, प्रभाग दोनमधील नगरसेवकपदाचे उमेदवार प्रशांत मधुसूदन नाईक, प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे, प्रभाग पाचमधील उमेदवार निवेदिता राजेंद्र वाघमारे, समिर मधूकर ठाकूर, प्रभाग सातमधील उमेदवार ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर, तसेच प्रभाग तीनमधील उमेदवार साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील यांनी प्रचाराला सुरुवात केली. अलिबाग शहरातील जागृत देवस्थान असलेल्या श्री काळंबादेवीचे दर्शन घेण्यात आले. त्यानंतर नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर शहरातील हजरत अली शाह दरबार येथे जाऊन दर्शन घेतले.त्यानंतर चेंढरे येथील श्री हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेऊन प्रचार सुरु केला. मतदारांना भेटून मतदान करण्याचे आवाहन उमेदवारांनी केले. महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदारांकडून प्रचाराच्यावेळी उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. अक्षया नाईक यांच्यासह अनेक उमेदवारांचे मतदारांकडून स्वागत करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील,माजी नगरसेविका अश्विनी पाटील, सतिश प्रधान, अशोक प्रधान, इंद्रनील नाईक, सुनील थळे, रविंद्र ठाकूर, काका ठाकूर, ॲड. उमेश ठाकूर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भास्कर चव्हाण, संजना कीर, ॲड. संतोष म्हात्रे आदी शेकाप, काँग्रेस, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, असंख्य कार्यकर्ते, तरुण मंडळी उपस्थित होते.

## मार्चअखेर हापूसचे आगमन

तापमानाचा पारा १८ अंशापर्यंत नोंदवला आहे.

कोकणात गरम हवा, लाल आणि खडकाळ माती आंब्यासाठी पोषक असते. कोकणात मोठ्या प्रमाणात आंबा प्रमुख फळ येते. आता थंडी पडायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे झाडांना नवीन पालवी फुटण्यास सुरुवात होईल, असे शेतकऱ्यांना वाटत आहे, परंतु अद्याप झाडाला मोहोर आलेला नाही. थंडी पडून आठवडा झाला आहे. साधारणतः १५ नोव्हेंबरपासून मोहोर येण्यास सुरुवात होते, पण मार्च अखेरीस आंबा दाखल होईल, असा अंदाज आहे.

**जमिनीत ओलावा**

नोव्हेंबरमध्ये पाऊस शेवटपर्यंत राहिल्यामुळे जमिनीतील ओलावा संपलेला नाही. अखेरचा पाऊस जास्त झाल्यामुळे आंब्याच्या मोहोराला पोषक नसते. आंब्याची झाडे पोषक आहेत. मोहोर येण्यास थंडी आणि गरमी, असे दोन्ही वातावरण मर्यादित अवस्थेत आहेत. कापलेले गवत पुन्हा उगवत आहे. त्यामुळे एक महिना उशिराने आंबा येणार असल्याचा अंदाज आहे.

## चेष्टा मस्करीतून तरुणावर चाकूने वार

झोहेब याने सोबत आणलेल्या चाकूने अरबाज याच्या कानाजवळ, डोक्यावर, पाठीत, छातीवर, बरगडीवर असे संपूर्ण शरीरावर नऊ ठिकाणी सपासप वार करून जखमी केले.

या प्रकरणी आरोपी झोहेब अधिकारी याच्याविरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अरबाज याला ताब्यात घेण्यात आले आहे. याप्रकरणी पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी हे करीत आहेत.

## एसटीच्या स्मार्टकार्डची प्रतीक्षा कायमच

त्याच कंपनीच्या तांत्रिक कामांमध्ये बिघाड झाला. सर्व्हरची समस्या निर्माण झाली. त्यामुळे नव्याने स्मार्टकार्ड काढण्यास अडचण निर्माण झाली. मुदत संपलेल्या कार्डचे नूतनीकरणही करणे ही थांबले. २०१६ पासून स्मार्ट कार्ड योजना सुरु केली. एटीएम कार्डसारखे अद्ययावयत असे स्मार्टकार्ड हेच विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक व अन्य पासधारकांसाठी एसटी बस पासमधील ओळखपत्र बनले होते ते ओळखपत्र स्कॅन केल्यावर नोंदणी मशीनमध्ये केली जात होती. मात्र स्मार्टकार्ड मिळणे बंद झाले आहे. त्यामुळे सध्या आधारकार्ड व कागदी पासच्या भरवशावरच विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करावा लागत आहे.

## महामार्गावर भीषण अपघात

आणि ओंकार प्रमोद लिमये (३५, दोघे मुळ गाव पाडले, ता. दापोली, सध्या रा. केळशी) हे बाप-लेक जखमी झाले. प्रमोद यांना पुढील उपचारांसाठी महाड येथे हलविण्यात आले आहे. या घटनेची मंडणगड पोलीस स्थानकात नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली महिला हेड कॉन्स्टेबल वैशाली सुकाळे करत आहेत.

## मोखाड्याजवळ एसटी अपघातात २५ जखमी

रस्त्याची चाळण झाल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

बसचा अपघात इतका भीषण होता की, प्रवासी शिवराम झुगरे यांच्या नाकातोंडाला मार लागला. तर चंद्रकांत शिद यांच्या पाठीला आणि साहेबनूरबी खान यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली. त्यांच्यावर खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत. दोन गंभीर जखमी झालेल्या प्रवाशांना त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र चालक बस चालवताना मोबाईलवर बोलत असल्यामुळे अपघात झाल्याचे प्रवाशांनी सांगितले. श्रीघाट ते देवगाव या तीन किलोमीटर अंतराच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्याची चाळण झाली आहे. त्यामुळे खड्डे चुकवताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागते.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M ) /DIVN/MHD/ Tech/E-Tender-22/ 2025-26 Dtd.19.11.2025 RFX No. 7000038188** | **Sub:-** SRM E- Tender for supply of various size of clamp, Connector & Hardware at 220 kV Mahad Substation and EHV Line Maintenance Sub Division Mahad under EHV (O&M) Division Mahad for the year 2025-2026. | **Rs. 6,98,972/- (Excluding GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from 19.11.2025 @ 00:00 hrs to 03.12.2025 @ 23:59 Hrs for above tender
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Manoj V. Borse)**
**Executive Engineer (I/c)**
**EHV(O&M) Dn. Mahad**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM e-Tender Notice No. 16/2025-26**

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No. | RFx no. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 29/2025-26 | 7000038191 | (3rd Call) Annual civil maintenance works at 400KV Kharghar and 220KV Uran along with other civil works for the F.Y 2025-26. | 2406205.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: **www.mahatransco.in.**
**Contact person:** Dy. Executive Engineer (Civil), Panvel.
Telephone No. (022)27480325/ Mob no. 9765644291
**Executive Engineer (Civil), Panvel**


### तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र. ९३२ ते ९३७/२०२५

खालील तक्त्यातील स्तंभ २ मधील नमूद अर्जदार अनु.क्र. १ ते ६ — वादी

**विरुद्ध**

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत खांडपोली ता. सुधागड. जि. रायगड — प्रतिवादी

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्यूबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नाटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील तक्त्यातील नमूद अर्जदार यांनी त्यांचे मुलांचे जन्मनोंदीचे आदेश मिळणेकामी या कार्यालयाकडे अर्ज सादर केले आहेत. खालील तक्त्यात स्तंभ ४. मध्ये अर्जदार यांच्या मुलांची जन्मतारीख व स्तंभ ५ मध्ये जन्मठिकाण नमूद केले आहेत.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पता | मुलगा/मुलगी यांचे नाव व नाते | जन्मतारीख | जन्मठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. सुनिल लहू पवार, रा.चोपडेवाडी पो. खांडपोली ता. सुधागड जि. रायगड | ओंकार सुनिल पवार - मुलगा | २८/०५/२०१७ | मौजे चोपडेवाडी पो.खांडपोली ता. सुधागड जि.रायगड |
| २ | श्री. संजय अंकुश पवार, रा. चोपडेवाडी पो.खांडपोली ता. सुधागड जि.रायगड | समिर संजय पवार मुलगा | १३/०८/२०१९ | मौजे चोपडेवाडी पो.खांडपोली ता. सुधागड जि.रायगड |
| ३ | श्री. सुनिल सुदाम पवार, रा. चोपडेवाडी पो.खांडपोली ता. सुधागड जि.रायगड | किशोर सुनिल पवार -मुलगा | २०/०९/२०१६ | मौजे चोपटेवाडी पो.खांडपोली ता.सुधागड जि.रायगड |
| ४ | श्री. मंगेश सुरेश हिलम, रा. चोपडेवाडी पो.खांडपोली ता. सुधागड जि. रायगड | अंजली मंगेश हिलम -मुलगी | १५/०५/२०१९ | मौजे चोपडेवाडी पो.खांडपोली ता. सुधागड जि.रायगड |
| ५ | श्री. अरुण जानू पवार रा. चोपडेवाडी पो.खांडपोली ता. सुधागड जि.रायगड | आरती अरुण पवार -मुलगी | १७/११/२०१७ | मौजे चोपडेवाडी पो. खांडपोली ता. सुधागड जि.रायगड |
| ६ | श्री. संजय अंकुश पवार रा. चोपडेवाडी पो.खांडपोली ता.सुधागड जि. रायगड | साहिल संजय पवार मुलगा | २८/१०/२०१६ | मौजे चापडवाडी पो.खांडपोली ता.सुधागड जि.रायगड |

प्रकरणी वरील तक्त्यातील नमूद अर्जदार यांनी त्यांचे मुलांची जन्मनोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे स्वयंघोषणापत्रात नमुद करून त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केले आहेत.

तरी वरील तक्त्यातील नमूद अर्जदार यांच्या मुलांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची काही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- ०६/११/२०२५

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

### जाहिर सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की आमच्या अशिलांच्या निर्देशानुसार याखाली लिहलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक विशेषत: वर्णन केलेल्या जमिनीसंदर्भात याखाली लिहलेल्या **अनुसूची**मध्ये नमुद केलेल्या मालकांचे मालकीहक्क, शिर्षक आणि हितसंबंधाबाबत आम्ही चौकशी करीत आहोत.

सर्व व्यक्तींचे याखाली लिहलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनीवरील किंवा तीच्या कोणत्याही भागावरील मालकांचे मालकी हक्क, शिर्षक आणि हितसंबंधा विरोधात/वर/संदर्भात वारसाहक्क, गहाणवट, विक्री, सामंजस्य करार, विक्रीचा करार, विकास हक्कांचे अनुदान, हस्तांतरण, नियुक्ती, भाडेपट्टी, उप—भाडेपट्टी, परवाना, धारणाधिकार, भार, विश्वस्त, वारसा, देखभाल, सुविधाधिकार, मार्गाचा अधिकार, बक्षिस, संपादन, मागणी, कोणत्याही ट्रस्ट अंतर्गत कोणताही बोजा किंवा फायदेशीर हक्क/हित, प्रिस्क्रीप्शन किंवा प्रीएम्शनचा अधिकार किंवा कोणत्याही करार किंवा इतर प्रवृत्तीअंतर्गत किंवा कोणत्याही न्यायालयाने किंवा खटला प्राधिकारीने पारित केलेला हुकूम, मनाई आदेश किंवा जप्ती किंवा निवाडा, प्रलंबित दावे, कोणत्याही अभिनिर्णय प्राधिकाऱ्यांचे हुकूम किंवा आदेश, विनिमय, विभागणी, मुखत्यारपत्र, मृत्युपत्र, वसीहत, चटई क्षेत्र निर्देशांक, कुळ, विकसन अधिकार, कौटुंबिक व्यवस्था /तडजोड, ताबा, वितरण किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा आणि/किंवा मागणी **("दावा")** असल्यास त्यांनी याद्वारे अधोस्वाक्षरीदारांना खैतान ॲण्ड कंपनी, वकिल, वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर—१सी, १३वा मजला, सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. अभिराज गांधी यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेल वर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत आवश्यक सहाय्यक कागदपत्रांच्या प्रतींसहीत लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे, अन्यथा, असे कोणतेही दावे, हक्क, शिर्षक, इस्टेट किंवा हितसंबंध अस्तित्वात नाही असे मानले जाईल आणि ते सोडुन दिले आहेत किंवा माफ केले गेले आहेत आणि/किंवा ते मालकांवर आणि/किंवा आमच्या अशिलांवर बंधनकारक नाही असे समजले जाईल.

**येथे वर संदर्भित अनुसूची**

तालुका अलिबाग आणि जिल्हा रायगड येथे स्थित खालील गट क्रमांक असलेल्या जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड:

| गट क्र | क्षेत्रफळ (चौरस मिटर्समध्ये) | गाव | मालक | चर्तु:सीमा |
|---|---|---|---|---|
| ४२/१ (पार्ट) | ३१,४५० पैकी २०,५०० | सोगाव | राजेंद्र नारायण पेठे, जाईली रविंद्र जोशी, आणि केदार रविंद्र जोशी | पूर्वेकडे : सोगावमधील अंशत: गट क्रमांक ४३, ४५, ४६ आणि ११ पश्चिमेकडे : सोगावमधील अंशत: गट क्रमांक ८६ आणि ४० उत्तरेकडे : सोगावमधील अंशत: अंतर्गत रस्ता आणि अंशत: गट क्रमांक ४३, ७२ आणि ७३ दक्षिणेकडे : सोगावमधील गट क्रमांक ४० |
| ४२/२ | ९,६०० | सोगाव | रंजना श्रीकांत पेठे, श्रीरंग श्रीकांत पेठे, मोहन मधुकर पेठे, नेहा कौस्तुभ पेठे, आणि ऋतुजा कोस्तुभ पेठे | |
| ४०/२ (पार्ट) | ९,६०० पैकी ५६ | सोगाव | राजेंद्र नारायण पेठे, जाईली रविंद्र जोशी, आणि केदार रविंद्र जोशी | पूर्वेकडे : सोगावमधील अंशत: गट क्रमांक ४० (पार्ट) आणि मुनावलीमधील गट क्रमांक ११(पार्ट) पश्चिमेकडे : सोगावमधील अंशत: गट क्रमांक ४० (पार्ट) आणि मुनावलीमधील गट क्रमांक ११(पार्ट) उत्तरेकडे : गट क्रमांक ४२/१ दक्षिणेकडे : महामार्ग |
| ११ (पार्ट) | ३,९३० पैकी ३२० | मुनावली | | |

आज दिनांक १९ नोव्हेंबर २०२५

**खैतान ॲण्ड कंपनीकरिता**
**सही /–**
**अभिराज गांधी**
**भागीदार**

### जाहीर नोटीस
**(गाव मौजे चंदरगाव, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील सर्वे नंबर ४७/४ मधील मिळकती बाबत)**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही खालील नमूद व्यक्तींच्या मालकी वहिवाटीची असून ती हरप्रकारे संपूर्णत: निर्वेध व नि:जोखमी व मार्केटेबल असल्याचा भरवसा देवून सदर मालकांनी ती आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबूल केलेले असून काही मोबदला रक्कम स्विकारून तसा करारही लिहून दिलेला आहे. तरी, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा विक्री, गहाण, दान, बक्षीस, लीन, लीज, करार–मदार, चोळी–बांगडी, मेंटेनन्स, साठेखत, विसार पावती, एमओयु, मुखत्यारपत्र, अदलाबदल, ताबा, वहिवाट, हिस्सा, क्लेम, वाटणी, कोर्ट कारवाई, मनाई हुकुम, कर, शासकीय–निमशासकीय देणी, इत्यादि अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क/बोजा/क्लेम/मागणी/अधिकार/न्यायप्रविष्ट वाद/निकालीत वाद/ न्यायप्रविष्ट होण्याच्या प्रक्रियेत असलेला वाद वगैरे असल्यास अथवा प्रस्तुत व्यवहारास कोणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी **प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे आत** मूळ कागदपत्रांनिशी खालील पत्त्यावर समक्ष भेटून वा लेखी कळवून खात्री पटवून द्यावी व तशी पोहोच घ्यावी अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व नि:जोखमी असून सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दावा, वाद नाही वा असल्यास संबंधितांनी तो जाणीवपूर्वक, कायमस्वरूपी सोडून दिलेला आहे आणि प्रस्तुत व्यवहारास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. परस्पर कोणत्याही वर्तमानपत्रात अथवा इतरत्र दिलेले उत्तर, हरकत, वगैरे आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याचीही नोंद घ्यावी.

**परिशिष्ट:** मे. तहसीलदार व जिल्हाधिकारी अलिबाग, महाराष्ट्र यांचे हद्दीतील व मे. दुय्यम निबंधक साहेब सुधागड, जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील गाव मौजे चंदरगाव, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील सर्वे नंबर ४७/४ मधील खालील वर्णनाचे क्षेत्र:

| मालकाचे नाव | सर्व्हे क्रमांक | खाते क्रमांक | एकूण क्षेत्र गुंठे (आर) |
|---|---|---|---|
| **पांडुरंग दशरथ मोहिते** | ४७/४ | ३२४ | २० (४८ गुंठेपैकी) |
| **राजन प्रकाश मोहिते** | ४७/४ | ५५० | २१ |
| **एकूण** | – | – | ४१ गुंठे (१.०२५ एकर |

**सदर ४१ गुंठे (१.०२५ एकर) जमिनीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे:**

पूर्वेस : सर्व्हे क्र. ४७/५,
दक्षिणेस : सर्व्हे क्र. ४६,
पश्चिमेस : सर्व्हे क्र. ५३,
उत्तरेस : सर्व्हे क्र. ५३/2.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस. ठिकाण: मुंबई, दिनांक: १९/११/२०२५

**पराग कमलकिशोर राठी**
**(ॲडव्होकेट).**
**फ्लॅट नंबर ७, अजय अपार्टमेंट, आनंद पार्क समोर, शंकरशेठ रोड, गुलटेकडी, पुणे – ३७.**
**मो. ९८८१४६५०६१, Email: law.parag@gmail.com**

### जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक १. श्रीमती. सुनिता मुरलीधर मान्टे व २ श्री. संदिप मुरलीधर मान्टे यांच्याकडून कायम स्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असून देखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र(हे.आर.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे,ता. अलिबाग,जि. रायगड. | २७६/१ | ०-०४-१० | ०.१७ |

व त्याअंतर्गत असलेली ग्रामपंचायत सातिर्जे, ता. अलिबाग कडील मालमत्ता क्र. ३६३, क्षेत्र १३२ चौ. मी. या घरमिळकतीसह.

अलिबाग,
दिनांक : १९/११/२०२५.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी, कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग,जि. रायगड, मो.:-९८२२५२८९३१,
ईमेल -adv.rdpatil@gmail.com.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतींसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| पुनम ए. डोगरा | २२/१५/अ | १० | २७३.०० | २७ | ३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.गौरकामथ,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१
दिनांक :- १९/११/२०२५

सही / -
**शंकेश राजेश ठाकरे**
अधिवक्ता
मो. नं. ९२८४८९२३८७

### जाहीर नोटीस

अर्जदारतर्फे वकिल ॲड. गोदावरी सुरेश करडे
श्रीवर्धन येथील मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सो., यांचे कोर्टात
दिवाणी चौ. अर्ज क्र. ५७/२०२५
नि. ७/ड
ने.ता. २३/१२/२०२५

१) श्रीम. स्मिता गणेश पाटील
वय वर्षे ४०, धंदा-गृहिणी
२) श्रीम. चंद्रभागा विश्राम पाटील
वय वर्षे ७०, धंदा-गृहिणी
३) श्री. खुशी गणेश पाटील
वय वर्षे १७, धंदा-शिक्षण
४) श्री. सिद्धी गणेश पाटील ... अर्जदार
वय वर्षे ११, धंदा-शिक्षण
अर्जदार क्र. १,२,३ व ४ हे
रा.मु.पो. वडघर (सतीची वाडी),
ता. श्रीवर्धन, जि. रायगड
अर्ज क्र. ३ व ४ करीता अ.पा.क.
अर्ज क्र. १ आई

विरूद्ध

कोणीही नाही ... सामनेवाला

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे-मु.पो. वडघर, सतीची वाडी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील मयत कै. गणेश विश्राम पाटील यांचे दिनांक ०८/०७/२०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मयताचे वारस अर्जदार हे आहेत. मयत कै. गणेश विश्राम पाटील यांचा वडघर, सतीची वाडी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथे मृत्यू झालेला आहे. तरी त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पश्चात त्यांची आई श्रीम. चंद्रभागा विश्राम पाटील, त्यांची पत्नी श्रीम. स्मिता गणेश पाटील, व त्यांच्या मुली कु. खुशी गणेश पाटील, कु. सिद्धी गणेश पाटील यांच्या नावे तीन चाकी वाहन MH 06 BV 3116 हे तीन चाकी वाहन नावावर होणेकरीता अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस असल्याबाबतचा अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदारांना देण्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नसून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक १७/११/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस प्रसिद्ध केली.

श्रीवर्धन
ता. १७/११/२०२५

सही/-
क. लिपीक
दिवाणी न्यायालय

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय

### जाहीर नोटीस
**(गाव मौजे चंदरगाव, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील सर्वे नंबर ४७/४ मधील मिळकती बाबत)**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही खालील नमूद व्यक्तींच्या मालकी वहिवाटीची असून ती हरप्रकारे संपूर्णत: निर्वेध व नि:जोखमी व मार्केटेबल असल्याचा भरवसा देवून सदर मालकांनी ती आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबूल केलेले असून काही मोबदला रक्कम स्विकारून तसा करारही लिहून दिलेला आहे. तरी, सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा विक्री, गहाण, दान, बक्षीस, लीन, लीज, करार–मदार, चोळी–बांगडी, मेंटेनन्स, साठेखत, विसार पावती, एमओयु, मुखत्यारपत्र, अदलाबदल, ताबा, वहिवाट, हिस्सा, क्लेम, वाटणी, कोर्ट कारवाई, मनाई हुकुम, कर, शासकीय–निमशासकीय देणी, इत्यादि अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क/बोजा/क्लेम/मागणी/अधिकार/न्यायप्रविष्ट वाद/निकालीत वाद/ न्यायप्रविष्ट होण्याच्या प्रक्रियेत असलेला वाद वगैरे असल्यास अथवा प्रस्तुत व्यवहारास कोणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी **प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे** आत मूळ कागदपत्रांनिशी खालील पत्त्यावर समक्ष भेटून वा लेखी कळवून खात्री पटवून द्यावी व तशी पोहोच घ्यावी अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व नि:जोखमी असून सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दावा, वाद नाही वा असल्यास संबंधितांनी तो जाणीवपूर्वक, कायमस्वरूपी सोडून दिलेला आहे आणि प्रस्तुत व्यवहारास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. परस्पर कोणत्याही वर्तमानपत्रात अथवा इतरत्र दिलेले उत्तर, हरकत, वगैरे आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याचीही नोंद घ्यावी.

**परिशिष्ट:** मे. तहसीलदार व जिल्हाधिकारी अलिबाग, महाराष्ट्र यांचे हद्दीतील व मे. दुय्यम निबंधक साहेब सुधागड, जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील गाव मौजे चंदरगाव, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील सर्वे नंबर ४७/४ मधील खालील वर्णनाचे क्षेत्र:

| मालकाचे नाव | सर्व्हे क्रमांक | खाते क्रमांक | एकूण क्षेत्र गुंठे (आर) |
|---|---|---|---|
| अरविंद प्रकाश मोहिते | ४७/४ | ५५९ | २१ (०.५२५ एकर) |
| पूजा प्रवीण मोहिते | ४७/४ | ५६२ | २१ (०.५२५ एकर) |
| संगीता अर्जुन चव्हाण | ४७/४ | ५६६ | २१ (०.५२५ एकर) |
| तेजस गणपत मोहिते | ४७/४ | ५७० | २१ (०.५२५ एकर) |
| शिवानी तेजस मोहिते | ४७/४ | ५७२ | २१ (०.५२५ एकर) |
| रंजना तानाजी चव्हाण | ४७/४ | ५७४ | २१ (०.५२५ एकर) |
| प्रकाश दशरथ मोहिते | ४७/४ | ५७६ | २१ (०.५२५ एकर) |
| रमेश दशरथ मोहिते | ४७/४ | ५७८ | २१ (०.५२५ एकर) |
| पिराजी दशरथ मोहिते | ४७/४ | ५८० | २१ (०.५२५ एकर) |
| प्रवीण प्रकाश मोहिते | ४७/४ | ५८४ | २१ (०.५२५ एरफ़र) |
| एकूण | – | – | २१० गुंठे (५.२५ एकर) |

**सदर २१० गुंठे (५.२५ एकर) जमिनीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे:**

पूर्वेस : सर्व्हे क्र. ४७/५,
दक्षिणेस : सर्व्हे क्र. ४४,
पश्चिमेस : सर्व्हे क्र. ४६,
उत्तरेस : सर्व्हे क्र. ४७/३.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस. ठिकाण: मुंबई, दिनांक: १९/११/२०२५

**पराग कमलकिशोर राठी**
**(ॲडव्होकेट).**
**फ्लॅट नंबर ७, अजय अपार्टमेंट, आनंद पार्क समोर, शंकरशेठ रोड, गुलटेकडी, पुणे – ३७.**
**मो. ९८८१४६५०६१, Email: law.parag@gmail.com**

### परिशिष्ट -१०
**(प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण प्रसिद्धी, नमुना-मराठी)**
**पनवेल महानगरपालिका**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता दि.११/११/२०२५ रोजी व दि.१७/११/२०२५ रोजी पनवेल महानगरपालिकेच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात प्रारूप आरक्षण सोडत घेऊन प्रभाग निहाय राखून ठेवायच्या अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासप्रवर्ग यासाठी सोडतीने व सर्वसाधारण जागांकरीता नेमून देण्याच्या जागा निश्चित केल्या आहेत. व त्यास मा.राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.५७/का-५ दि.१८/११/२०२५ ने मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार पनवेल महानगरपालिकेच्या २०२५ च्या सार्वत्रिक निवडणूकीकरीता अंतिम प्रभाग रचनेमधील प्रत्येक प्रभागातील जागानिहाय आरक्षण खालीलप्रमाणे राहील.

**एकूण जागांचा तपशील**

| अ. क्र | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी त्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित जागांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ६ | ३ |
| २ | अनुसूचित जमाती | २ | १ |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | २१ | ११ |
| ४ | सर्वसाधारण | ४९ | २४ |
| | एकूण | ७८ | ३९ |

**प्रभागातील जागानिहाय आरक्षणाचा तपशील**

| अ.क्र | प्रभाग क्रमांक | जागा क्र. | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | १-अ | ना.मा.प्र.(महिला) |
| २ | | १-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ३ | | १-क | सर्वसाधारण |
| ४ | | १-ड | सर्वसाधारण |
| ५ | २ | २-अ | ना.मा.प्र.(महिला) |
| ६ | | २-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ७ | | २-क | सर्वसाधारण |
| ८ | | २-ड | सर्वसाधारण |
| ९ | ३ | ३-अ | अनुसूचित जमाती(महिला) |
| १० | | ३-ब | ना.मा.प्र.(महिला) |
| ११ | | ३-क | सर्वसाधारण |
| १२ | | ३-ड | सर्वसाधारण |
| १३ | ४ | ४-अ | ना.मा.प्र |
| १४ | | ४-ब | सर्वसाधारण (महिला) |
| १५ | | ४-क | सर्वसाधारण (महिला) |
| १६ | | ४-ड | सर्वसाधारण |
| १७ | ५ | ५-अ | ना.मा.प्र |
| १८ | | ५-ब | सर्वसाधारण (महिला) |
| १९ | | ५-क | सर्वसाधारण (महिला) |
| २० | | ५-ड | सर्वसाधारण |
| २१ | ६ | ६-अ | अनुसूचित जाती(महिला) |
| २२ | | ६-ब | ना.मा.प्र |
| २३ | | ६-क | सर्वसाधारण (महिला) |
| २४ | | ६-ड | सर्वसाधारण |
| २५ | ७ | ७-अ | ना.मा.प्र. |
| २६ | | ७-ब | सर्वसाधारण(महिला) |
| २७ | | ७-क | सर्वसाधारण(महिला |
| २८ | | ७-ड | सर्वसाधारण |
| २९ | ८ | ८-अ | ना.मा.प्र |
| ३० | | ८-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ३१ | | ८-क | सर्वसाधारण(महिला) |
| ३२ | | ८-ड | सर्वसाधारण |
| ३३ | ९ | ९-अ | अनुसूचित जमाती |
| ३४ | | ९-ब | ना.मा.प्र(महिला) |
| ३५ | | ९-क | सर्वसाधारण(महिला) |
| ३६ | | ९-ड | सर्वसाधारण |
| ३७ | १० | १०-अ | ना.मा.प्र |
| ३८ | | १०-ब | सर्वसाधारण(महिला) |
| ३९ | | १०-क | सर्वसाधारण(महिला) |
| ४० | | १०-ड | सर्वसाधारण |
| ४१ | ११ | ११-अ | अनुसूचित जाती(महिला) |
| ४२ | | ११-ब | ना.मा.प्र |
| ४३ | | ११-क | सर्वसाधारण |
| ४४ | १२ | १२-अ | अनुसूचित जाती |
| ४५ | | १२-ब | ना.मा.प्र.(महिला) |
| ४६ | | १२-क | सर्वसाधारण(महिला) |
| ४७ | | १२-ड | सर्वसाधारण |
| ४८ | १३ | १३-अ | अनुसूचित जाती(महिला) |
| ४९ | | १३-ब | ना.मा.प्र.(महिला) |
| ५० | | १३-क | सर्वसाधारण |
| ५१ | | १३-ड | सर्वसाधारण |
| ५२ | १४ | १४-अ | ना.मा.प्र. |
| ५३ | | १४-ब | सर्वसाधारण (महिला) |
| ५४ | | १४-क | सर्वसाधारण (महिला) |
| ५५ | | १४-ड | सर्वसाधारण |
| ५६ | १५ | १५-अ | अनुसूचित जाती |
| ५७ | | १५-ब | ना.मा.प्र.(महिला) |
| ५८ | | १५-क | सर्वसाधारण(महिला) |
| ५९ | | १५-ड | सर्वसाधारण |
| ६० | १६ | १६-अ | ना.मा.प्र.(महिला) |
| ६१ | | १६-ब | सर्वसाधारण(महिला) |
| ६२ | | १६-क | सर्वसाधारण |
| ६३ | | १६-ड | सर्वसाधारण |
| ६४ | १७ | १७-अ | अनुसूचित जाती |
| ६५ | | १७-ब | ना.मा.प्र.(महिला) |
| ६६ | | १७-क | सर्वसाधारण(महिला) |
| ६७ | | १७-ड | सर्वसाधारण |
| ६८ | १८ | १८-अ | ना.मा.प्र.(महिला) |
| ६९ | | १८-ब | ना.मा.प्र. |
| ७० | | १८-क | सर्वसाधारण(महिला) |
| ७१ | | १८-ड | सर्वसाधारण |
| ७२ | १९ | १९-अ | ना.मा.प्र.(महिला) |
| ७३ | | १९-ब | सर्वसाधारण(महिला) |
| ७४ | | १९-क | सर्वसाधारण |
| ७५ | | १९-ड | सर्वसाधारण |
| ७६ | २० | २०-अ | ना.मा.प्र. |
| ७७ | | २०-ब | सर्वसाधारण(महिला) |
| ७८ | | २०-क | सर्वसाधारण (महिला) |

सदर जाहिर सूचनेत नमुद केल्यानुसार आरक्षणाबाबत काही हरकती/सूचना असल्यास त्या दिनांक १९/११/२०२५ ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत पनवेल महानगरपालिका मुख्यालय येथे तसेच प्रभाग समिती कार्यालय, प्रभाग समिती अ, ब, क, ड, व उपविभाग नावडे या ठिकाणी सादर करावयात.

**स्वाक्षरी**
**आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

# एसटी कर्मचाऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक

। वैष्णवी वाडकर।
। रेवदंडा ।

अलिबाग-पनवेल मार्गावर दररोज हजारो प्रवासी एसटी बसने प्रवास करतात. खासगी प्रवास परवडत नसल्याने बहुतांश नोकरदार व विद्यार्थी एसटीवर अवलंबून असतात. मात्र, एसटी वेळेवर न येणे तसेच मध्येच रस्त्यात बंद पडणे या घटनांमुळे प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यातच एसटी कर्मचाऱ्यांचा मनानी कारभार आणि प्रवाशांसोबत उध्दटपणे वागण्याचा प्रकार देखील उघडकीस आला आहे. त्यामुळे अलिबाग-पनवेल मार्गावरील प्रवाशांना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या एसटी कर्मचाऱ्याविरोधात नाराजीचे सुर उमटत आहेत.

अलिबाग व पनवेल ही दोन्ही शहरे नोकरी व व्यवसायाच्या दृष्टीने महत्वाची आहेत. त्यामुळे दररोज अलिबाग ते पनवेल या मार्गावर हजारो प्रवासी प्रवास करत असतात. या मार्गावरील पेण, वडखळ, पोयनाड, पेझारी, कार्लेखिंड, खंडाळे, वाडगाव येथून पनवेल व अलिबाग येथे नोकरदारांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने येत असतात. ते खासगी प्रवास परवडत नसल्याने ते पुर्णतः एसटीवर अवलंबुन असतात. अलिबाग ते पनवेल प्रवासासाठी विनाथांबा बस सेवा देखील सुरू आहे. तरीदेखील या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तासंतास एसटीची वाट बघावी लागते. या त्रासातच प्रवासी वर्गाला एसटी कर्मचाऱ्यांच्या अरेरावीचा देखील सामना करावा लागत आहे. असाच एक प्रकार सोमवारी (दि.१७) सकाळच्या सुमारास अलिबाग-पेझारी या एसटी बसमध्ये घडला आहे. सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास अलिबाग एसटी स्थानकात अलिबाग-पनवेल या मार्गावरील प्रवाशांनी एसटीची जवळजवळ एक तास वाट पाहिली. तरीदेखील या मार्गावरून जाणाऱ्या एसटीचा काहीच ठावठिकाणा नव्हता. त्यांनतर या मार्गावर धावणारी अलिबाग-पेझारी एसटी फलाटावर लागली.



एसटी उशीरा लागल्याने फलाटावर प्रवाशांची प्रचंड गर्दी जमली होती. अलिबाग ते पेझारी दरम्यान उतरणाऱ्या प्रवाशांनी बसमध्ये चढायला सुरूवात करताच वाहकाने सगळ्यांना बसच्या शेवटच्या सिटकडे जाण्यास सांगितले. त्यांनतर एसटी वाहकाचा आवाज वाढत गेला आणि त्याने महिला प्रवाशांसह इतर प्रवाशांसोबद उध्दटपणे बोलायला सुरूवात केली. त्यातील बऱ्याचश्या प्रवाशांना जवळच्या थांब्यावर उतरायचे होते. त्यामुळे त्यांनी बसच्या दरवाजाजवळ उभे राहून गर्दी केली होती. त्यावेळी एसटीच्या वाहकाने दरवाजाजवळील जागा रिकामी करायला सांगितली. त्यातील काही प्रवासी मागच्या सिटकडे गेले आणि ज्यांना लगेचच उतरायचे होते म्हणून ते प्रवासी दरवाजाजवळच उभे राहिले. तरीदेखील वाहकाने त्यांना धक्का देत मागे जाण्यास सांगितले. पुढे त्यांच्यात वाद वाढत गेला आणि इतर प्रवाशांनी संबंधित प्रवाशाला नमते घेण्यास सांगितले. त्यामुळे हा वाद संपुष्टात आला. यादरम्यान, आम्ही सहकार्य करतो म्हणून हे एसटी कर्मचारी अती करत असल्याच्या प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त करण्यात आल्या. या सर्व प्रकारामुळे प्रवासी वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागला.

### वाहकाची अरेरावी

**सर्वसामान्यांची जीवनवाहिनी म्हणून ओळख असलेली लालपरी म्हणजेच एसटी बस ही आता कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे बदनाम होत आहे. आधीच एसटी बसेसच्या दुरवस्थेमुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. त्यातच आता एसटी वाहकाच्या आरेरावीमुळे ती आणखीनच बदनाम होत चालली आहे. एसटी बसमधील प्रवास सुखकर व्हावा यासाठी एसटी चालक-वाहक आणि इतर कर्मचारी प्रवाशांची काळजी घेत असतात. परंतु, एसटी वाहकाच्या अरेरावीमुळे प्रवाशांना अपमानास्पद वागणूक मळित असल्याने प्रवासी वर्गातून नाराजीचे सुर उमटत आहेत.**

> **संबंधित वाहकाच्या विरोधात तक्रार आलेली आहे. त्यामुळे त्याच्यावर योग्य ती कारवाई करू. प्रवाशांना चांगली वागणूक देण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करू.**
> **- राकेश देवरे, व्यवस्थापक, एसटी आगार अलिबाग**



● गुलाबी थंडीतील मुरूडमधील एकदरा पुलावरून उबदार सुर्यकिरणांचे मनमोहक सुवर्ण दर्शन.. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## देवीच्या मुखवट्यांनी बाजारपेठा सजल्या



। पनवेल । प्रतिनिधी ।

मार्गशीर्ष महिना अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे पनवेलच्या भाजी मार्केटमधील बाजारपेठा देवींचे आकर्षक मुखवटे आणि पूजन साहित्यांनी गजबजल्या आहेत. यंदा मार्गशीर्ष महिना शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर पासून सुरू होत असून आतापासूनच देवी प्रतिष्ठापनेसाठी महिला वर्गासह पुरूष मंडळी मोठ्या उत्साहात खरेदीस सुरुवात करताना दिसत आहेत. उपवास, नित्यपूजन आणि भक्तीच्या तयारीने मार्केटमध्ये सणासुदीचे वातावरण रंगत आहे.

## पालीत पथनाट्याला मोठा प्रतिसाद



। खारेपाट । प्रतिनिधी ।

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती व उन्नती व्हावी याकरिता रायगड जिल्हा पोलिसांकडून महत्त्वकांक्षी प्रेरणादायी उपक्रमात कला, क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबवण्यात आले. याकरिता रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे चांगले सहकार्य लाभले.

वावलोली पाली आश्रम शाळा येथे देव एक्टिंग अकॅडमी पनवेल यांच्यामार्फत व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा, बालविवाह, शिक्षण यावर आधारित पथनाट्य सादर करण्यात आले. हे पथनाट्य प्रकाश पाटील लिखित असून देवदत्त घरत यांनी दिग्दर्शित केले आहे. या पथनाट्यात देवदत्त घरत, प्रकाश पाटील, संजय पोइलकर, महेंद्र म्हात्रे, हर्षल धुमाळ, सार्थक नम सुळे, जयश्री घरत, वरद पाटील, प्रमोद पाटील या कलावंतांनी चांगल्या प्रकारे सादरीकरण केले.

# रेवदंडा बसस्थानकाची दुरवस्था



। रेवदंडा । प्रतिनिधी ।

रेवदंडा एस.टी. बसस्थानक आवारात पडलेले खड्डे व बेशिस्तीने केलेली वाहन पार्किंग यामुळे अपघातास निमंत्रण ठरत आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

रेवदंडा एसटी बस स्थानक हे अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे या तिन्ही तालुक्यातून येणाऱ्या बसेस रेवदंडा एसटी आगारातून ये-जा करत असतात. त्यामुळे याठिकाणी प्रवासीवर्ग व स्थानिकां वर्दळ असते. यंदाच्या पावसाळ्यात स्थानक आवारात पडलेल्या खड्ड्यात पाणी साचून तळी निर्माण झाली होती. आता पाऊस थांबला असून हे खड्डे कोरडे पडल्यामुळे निदर्शनास येत आहेत. या स्थानकात जेव्हा एसटी येते तेव्हा तिला या खड्ड्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे एसटीतील प्रवाशांना त्यांचा नाहक त्रास सहन करावा लागतो. तसेच, हे खड्डे चुकविताना वाहन चालकांना देखील तारेवरची कसरत करावी लागते. या बस स्थानक आवारात बेशिस्ती पणे लहान-मोठी उभी करून ठेवली जातात. त्यामुळे स्थानकात येणाऱ्या बसला त्याचा आडथळा होतो. त्यामुळे रेवदंडा स्थानकातील खड्डे व बेशिस्त पार्किंग अपघाताला निमंत्राण ठरत आहेत.

# आगामी निवडणुका मविआतूनच लढणार

## बाळाराम पाटील यांची घोषणा




। पनवेल । प्रतिनिधी ।

आगामी पनवेल आणि उरणमधील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका शेतकरी कामगार पक्ष हा महाविकास आघाडीतूनच लढणार, अशी घोषणा माजी आमदार बाळाराम पाटील यांनी केली आहे. पनवेलमधील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोमवारी (दि.१७) शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना बाळाराम पाटील म्हणाले की, लवकरच आपण महाविकास आघाडीची बैठक घेत आहोत आणि त्यामध्ये रायगड जिल्हा परिषद, पनवेल व उरण पंचायत समिती, पनवेल महानगरपालिका इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या जागा वाटपांबाबत विचार विनिमय करणार आहोत. तसेच, पनवेल मधील रस्त्याचे काम अगदीच निकृष्ट दर्जाचे होत आहे. त्यामुळे पहिल्याच पावसात हे रस्ते उखडले गेलेत आणि आता तेच कॉन्ट्रॅक्टर सांगत आहेत की आम्ही स्वखर्चाने रस्ते दुरुस्त करून देऊ. याचा अर्थ असा की, या रस्त्याच्या कामांमध्ये कितीतरी मोठा भ्रष्टाचार झाला आहे, असेही माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील, पनवेल महानगरपालिका चिटणीस प्रकाश म्हात्रे, माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे, गोपाळ भगत, शंकर म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

# दुचाकी सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

। पनवेल । प्रतिनिधी ।

महापालिकेच्या व्यापारी संकुलामध्ये उभी केलेली दुचाकी चोरी झाल्यानंतर काही तासांत ही दुचाकी पनवेल रेल्वेस्थानकाजवळील रस्त्यावर अनोळखी चोरट्याने उभी केलेली सापडली. वाहन चोरांच्या या नव्या शक्कली मागील सूत्रधाराचा शोध पनवेल शहर पोलीस घेत आहेत. यापूर्वीही चोरीची दुचाकी या रस्त्यावर सापडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पनवेल शहरातील रहिवासी आणि महापालिकेतील एक कर्मचारी यांना प्रशिक्षणाच्या कामासाठी पनवेल शहरात नेमल्यामुळे सकाळी त्यांनी त्यांची दुचाकी फडके नाट्यगृहाच्या शेजारील व्यापारी संकुलाच्या वाहनतळात उभी केली. दुपारी सव्वा वाजता पुन्हा दुचाकीकडे आल्यावर त्यांना दुचाकी सापडली नाही. त्यामुळे त्यांनी सर्वत्र शोधाशोध केली, मात्र दुचाकी न सापडल्याने त्यांनी थेट पोलीस ठाणे गाठले. शहरात वाहनचोरीचे प्रकार वाढल्याने वाहनांची सूरक्षा हा महत्त्वाचा मुद्दा रहिवाशांसाठी बनला आहे. चोरट्यांनी मात्र यावेळी महापालिकेच्या व्यापारी संकुलातील वाहनाला लक्ष्य केल्यामुळे महापालिकेच्या व्यापारी संकुलाची सूरक्षा सुद्धा ऐरणीवर आली आहे. रविवारी चोरीस गेलेल्या दुचाकीचा शोध पनवेल रेल्वे स्थानक रस्त्यावरील वाहनतळात घेण्याचा सल्ला एका नागरिकाने दिल्यामुळे त्या परिसरात दुचाकी शोधल्यानंतर तेथील रस्त्यावर दुचाकी बेवारस उभी असल्याची आढळली. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ यांना माहिती मळिाल्यावर ही चोरीची दुचाकी येथे कोणी ठेवली याविषयी तांत्रिक तपास सुरू केला आहे.

## रस्त्याच्या दुतर्फा गवताचे साम्राज्य

**म्हसळा** : म्हसळा-सांगवड मार्गावर रस्त्याच्या बाजूला गवताचे सम्राज्य वाढले असून हा रस्ता अपघाताला निमंत्रण देत आहे. पावसाळा संपला तरी या रस्त्याच्या बाजूला वाढलेल्या गवताची छाटणी झाली नसल्यामुळे प्रवासी वर्गातून नाराजीचा सूर उमटत आहेत. या मार्गावर काही ठिकाणी सात ते आठ फुट गवत वाढले असून समोरील येणाऱ्या वाहनांचा अंदाज येत नसल्यामुळे अपघाताची दाट शक्यता वर्तविली जात आहे. गावागावांतील रस्त्यांवरील गवत काढणे ही बांधकाम विभागाची जबाबदारी आहे; मात्र कोणत्याच रस्त्यावरील दोन्ही बाजूचे गवत कधीच काढले जात नाही, असा आरोप स्थानिकांमधून होत आहे.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना | जिल्ह्यातील ४६ केंद्रांवर धानाची खरेदी

# शेतकऱ्यांना धान्य विकण्यासाठी सोयीस्कर पर्याय

। अलिबाग । प्रतिनिधी ।

किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजनेंतर्गत दि.महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटिंग फेडरेशन मुंबई यांच्या मार्फत खरीप व रब्बी हंगाम २०२५-२०२६ करिता धानाची (भाताची) खरेदी करण्यात येणार आहे. ही धान खरेदी जिल्हा पणन अधिकारी यांच्या अखत्यारीत असलेल्या ४६ खरेदी केंद्रावर होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे. या योजनेअंतर्गत केंद्र शासन निरनिराळ्या पिकांच्या किमान आधारभूत किंमती जाहीर करते. आधारभूत किंमतीचा लाभ शेतकऱ्यांना होण्याच्या दृष्टीने व त्यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने



(डीस्ट्रेस सेल) धान्य विकावे लागू नये, म्हणून राज्य शासनातर्फे एफ.ए.क्यू (वाजवी सरासरी गुणवत्ता) दर्जाच्या धानाची/भरडधान्याची खरेदी करण्यात येते. या योजनेंतर्गत खरीप व रब्बी हंगाम २०२५-२०२६ करिता धानाची (भाताची) खरेदी करण्यात येणार आहे. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्याकडील दि.४ नोव्हेंबर शासन निर्णयान्वये भात खरेदीचा धान-खरीप पणन हंगाम कालावधी दि.३ नोव्हेंबर ते ३१ मार्च २०२६, तर भरडधान्य खरीप पणन हंगाम कालावधी दि.१ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी २०२६ असा असणार आहे. रब्बी पणन हंगाम केंद्र शासनाकडून प्राप्त सूचनांनुसार राहणार आहे. ही धान खरेदी अलिबाग तालुक्यातील शिरवली, नांगरवाडी, मालाडे, झिराड, रामराज, चोंढी, रेवदंडा, बोर्ली, पेण तालुक्यातील पेण, बोर्झे, वडखळ, कामार्ली, वढाव, वरसई, शिर्कीचाळ, पनवेल तालुक्यातील मार्केटयार्ड पनवेल-१, खालापूर तालुक्यातील चौक, खालापूर, कर्जत तालुक्यातील कर्जत, दहिवली, वैजनाथ, कडाव, कशेळे, नेरळ, सुधागड तालुक्यातील सुधागड, परळी, पाली, पेडली, नाडसूर, वाघोशी, झाप, रोहा तालुक्यातील यशवंतखार, रोहा, कोलाड, चणेरा, शेणवई, मेढा, श्रीवर्धन तालुक्यातील रानिवली, सायगाव, बोर्ली, माणगाव तालुक्यातील माणगाव, चांदोरी तळेगाव, महाड तालुक्यातील महाड, पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर, देवळे व म्हसळा तालुक्यातील म्हसळा अशा एकूण ४६ केंद्रांना पणन हंगाम २०२५-२०२६ मधील धान खरेदीकरिता मंजूरी देण्यात आली आहे.

### आवश्यक कागदपत्रे

भात खरेदीच्या वेळी शेतकऱ्यांनी आपल्याकडील जमिनीबाबतचा ७/१२ उताऱ्याची व गाव नमुना ८(अ) ची छायाकिंतप्रत खरेदी केंद्रावर धान विक्रीकरिता आणणे आवश्यक आहे. या उताऱ्यातील धान्य व धानाखालील क्षेत्र पाहून धान/भरडधान्य खरेदी करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या ७/१२ उतारानुसार पीकाखालील क्षेत्र, या वर्षीची पीक परिस्थिती (पैसेवारी), पीकाचे सरासरी उत्पादन या सर्व बाबी विचारात घेऊन, धान/भरडधान्य खरेदी करण्यात येईल. तसेच, धानाची खरेदी ही ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने संबधित शेतकऱ्यांची नोंदणी करणे आवश्यक राहील. याकरिता खरेदी केंद्रावर भात विक्रीकरिता आणताना प्रत्येक शेतकऱ्यांनी सोबत आपल्या आधारकार्डाची तसेच बँकेच्या पासबुक आणणे आवश्यक आहे.

### धानाच्या आधारभूत किंमती

सर्वसाधारण भात: २ हजार ३६९ रुपये प्रति क्विंटल
भात (अ श्रेणी): २ हजार ३८९ प्रति क्विंटल
भरडधान्य-ज्वारी (संकरित): ३ हजार ६९९ प्रति क्विंटल
ज्वारी (मालदांडी): ३ हजार ७४९ प्रति क्विंटल
बाजरी: २ हजार ७७५ प्रति क्विंटल
मका: २ हजार ४०० प्रति क्विंटल
रागी: ४ हजार ८८६ प्रति क्विंटल

## निवडक



### मेंढ्यांचे कळप कोकणात दाखल

**तळा** : थंडीची चाहूल लागण्यास सुरुवात झाली की घाटमाथ्यावरील मेंढपाळ मेंढ्यांना घेऊन आपला मोर्चा कोणाकडे वळवतात. या कालावधीत कोकणात या मेंढ्यांसाठीचा चारा जंगलात मोठ्या प्रमाणात मळित असतो. त्यामुळे उन्हाळा येईपर्यंत मेंढ्यांचे चांगल्या प्रकारे पालनपोषण करता येत असल्याने मेंढ्यांचे संरक्षणही चांगले होते. त्यामुळे हे मेंढपाळ मजल दर मजल करत कोकणातील भागात येत असून हे आता तळा तालुक्यात आले आहेत. तसेच, एका एका शेतात रात्रीच्या वेळी या मेंढ्या बसविण्यात येतात. त्यामुळे मेंढ्यांचे मळमुत्र त्या शेतात पडून शेतीचा कस वाढून शेती उत्पन्न वाढते. अशाप्रकारे मेंढपाळ आपल्या मेंढ्या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात काही ठराविक दिवस बसवितात. त्या मोबदल्यात मेंढपाळांना तांदूळ अथवा ठराविक रक्कम दिली जाते. अशा प्रकारे मेंढपाळ शेतकऱ्यांच्या शेतात मेंढ्या बसवून पुढे वेगवेगळ्या गावात आपला प्रवास घाटमाथ्यावर जाईपर्यंत करतात.

### तळोजातील नाकाबंदीत सापडली दुचाकी



**पनवेल** : तळोजा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलीस हवालदार डावकरे व शिपाई देवकते हे आरएएफ सिग्नल येथे वाहतुकीचे नियमन करीत होते. यावेळी पनवेलच्या दिशेने आलेल्या दुचाकीवरील चालक व त्याच्या पाठीमागे बसलेल्या व्यक्तीची हालचाल ही वाहतूक पोलिसांना संशयास्पद वाटली. यादरम्यान देवकाते व डावकरे यांनी त्या दुचाकी चालकाला थांबवण्याचा प्रयत्न केला. त्या दुचाकी चालकासह मागे बसलेल्याने ती मोटारसायकल जागेवरच सोडून तेथून पळ काढला. वरिष्ठ अधिकारी यांना ही माहिती देऊन त्या दुचाकीची माहिती काढली असता या गाडीचा मूळ ओंकार गायकवाड हे असून ही दुचाकी चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर ओंकार गायकवाड यांना तळोजा येथे बोलावले व तळोजा पोलीस ठाण्यात ती दुचाकी पुढील कारवाईसाठी देण्यात आली. त्यामुळे चोरीला गेलेली दुचाकी सापडल्याने मालक गायकवाड यांनी वाहतूक पोलिसांचे आभार मानले.

### शेतकऱ्यांना ड्रिप सिंचन प्रणालीचे वितरण



**खांब** : दीपक फाऊंडेशन रोहाच्यावतीने यावर्षी रोहा तालुक्यातील ३० शेतकऱ्यांना ड्रिप सिंचन यंत्रणा उपलब्ध करून देऊन तिचे वितरण करण्यात आले. पाण्याची बचत, उत्पादनवाढ आणि आधुनिक शेती पद्धतींचा प्रसार हा यामागील मुख्य उद्देश आहे. या योजनेला शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मळित आहे. गेल्या दोन वर्षांत एकूण १५० शेतकऱ्यांना ड्रिप प्रणालीचे वितरण करण्यात आले आहे. या कालावधीत शेतकऱ्यांनी आपल्या शेती उत्पादनात लक्षणीय वाढ साध्य करून जलसंधारणासोबतच खर्चातही मोठी बचत झाल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. स्थानिक शेतकऱ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत फाऊंडेशनचे मनापासून आभार मानले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने रोहा तालुक्यातील शेती अधिक सक्षम आणि समृद्ध होण्याच्या दिशेने हे मोठी पायरी मानली जात असल्याचे बोलले जात आहे. दीपक फाऊंडेशनतर्फे राबविण्यात येत असलेल्या प्रशिक्षणामुळे शेतकरी अधिक आत्मविश्वासाने आधुनिक शेती तंत्रांचा अवलंब करत आहेत. पुढील काळातही हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा फाऊंडेशनचा मानस असल्याचे सांगण्यात आले.

### सांकशी येथे गडसंवर्धन मोहीम

**पेण** : हिंदु जनजागृती समितीच्यावतीने गडसंवर्धन मोहीम पेण मधील किल्ले सांकशी येथे पार पडली. या मोहिमेत ८० हून अधिक युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या मोहिमेत सांकशी किल्ल्यावर साफसफाई, प्लास्टिक व कचरा गोळा करण्यात आला. तसेच, युवकांमध्ये आत्मविश्वास आणि स्वतःचे रक्षण करण्याची मानसिकता निर्माण व्हावी यासाठी गडावर पायथ्याशी कराटे, लाठीकाठी, दंडसाखळी यांचे प्रशिक्षण आणि स्वरक्षा प्रात्यक्षिके घेण्यात आली. या प्रशिक्षणाद्वारे तरुणांनी स्वतःचे आणि राष्ट्राचे संरक्षण करणे हा संदेश देण्यात आला. यादरम्यान, हिंदु जनजागृती समितीचे सुनील कदम म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या महान कार्यातून राष्ट्र आणि धर्मकार्य करण्याची प्रेरणा मिळावी. तसेच, गडांचे ऐतिहासिक महत्त्व आणि संवर्धन याबद्दल जनजागृती व्हावी, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. रायगड जिल्ह्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. गड-किल्ले मोहिमेत सहभागी झाल्यावर आपली क्षमता कळते. तसेच, ती वाढवण्याची प्रेरणाही

### सावरोली-खारपाडा मार्गावर केमिकलची गळती



**पाताळगंगा** : सावरोली-खारपाडा या मार्गावर सकाळच्या सुमारास एका वाहनातून केमिकल पडल्यामुळे सर्वत्र त्याचा उग्र वास पसरत असून रस्ता देखील चिकट होत आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणे दिवसेंदिवस धोक्याचे होत चालले आहे. तसेच, या उग्र वासामुळे नागरिक संतप्त झाले असून संबंधित वाहनांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. परिणामी या वासामुळे मळमळ होत असल्याचेही बोलले जात होते. सावरोली-खारपाडा या मार्गावर औद्योगिकिकरणोचे जाळे निर्माण झाल्यामुळे सातत्याने अवजड वाहनांची रेलचेल सुरू असते. विशेष म्हणजे या कारखान्याला लागणारा कच्चा तसेच तयार झालेला माल त्या अवजड वाहनांमध्ये पाठविला जातो. काही वेळा क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात माल भरल्यामुळे तो रस्त्यावर पडतो. त्यामुळे या मार्गावर प्रवास नागरिक व कामगार वर्ग यांच्या जीवावर बेतू शकते.

# लोकाग्रहास्तव फाशी

बांगलादेशाच्या माजी पंतप्रधान शेख हसिना यांना त्या देशातील विशेष न्यायालयाने फाशीची सजा सुनावली आहे. गेल्या वर्षी जुलैमध्ये बांगलादेशात उठाव झाल्यानंतर हसिना भारतात पळून आल्या होत्या व तेव्हापासून त्या इथेच राहत आहेत. अनधिकृतपणे का होईना भारताने त्यांना आश्रय दिलेला आहे व फाशीची सजा अमलात येण्याची तूर्त तरी शक्यता नाही. मात्र हसिना यांच्यावरची टांगती तलवार कायम राहील व त्यांच्या निमित्ताने भारताबद्दलचे शत्रुत्वही वाढत राहणार आहे. हसिना यांचा अवामी लीग हा पक्ष बांगलादेशाच्या मुक्तिलढ्यात अग्रेसर होता. तेव्हापासून भारताशी त्याचे चांगले संबंध आहेत. सेक्युलर व प्रागतिक विचारसरणीच्या या पक्षाला इतकी वर्षे लोकांमध्ये भरपूर पाठिंबा होता. पण बांगलादेशाची लोकसंख्या प्रचंड म्हणजे १७ कोटी आहे. त्या मानाने देश छोटा व गरीब आहे. हसिना या चार वेळा पंतप्रधान होत्या. त्यांच्या काळात देशाने बरीच आर्थिक प्रगती केली. विशेषतः कपडे तयार करण्याच्या कारखान्यांनी भारतालाही टक्कर दिली. आज जगात बांगलादेशातून सर्वाधिक कपडे निर्यात होतात. शिवाय, शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने आयटी वगैरेंमध्येही बांगला तरुणांनी चांगले नाव काढले. अरब देशात तसेच अमेरिका व युरोपमध्ये स्थलांतर केलेल्या बांगला तरुणांमुळे प्रचंड परकी चलन येते. पण लोकसंख्या आणि तरुणांची संख्या वाढली की अपेक्षा वाढतात. तितक्या प्रमाणात रोजगार निर्माण झाले नाहीत की असंतोष वाढतो. मग त्याला वेगळे वळण मिळते. पाकिस्तानच्या दडपशाहीच्या विरोधात लढून बांगला लोकांनी स्वातंत्र्य मिळवले. त्यामुळे पाकिस्तानी कट्टर धार्मिकता आणि लष्करी राजवटीतले दुर्गुण यांच्यापासून लांब जायला हवे व भारताचा आदर्श ठेवायला हवा असे बांगला समाजाला कायम वाटत आले. मात्र बेरोजगारी व असंतोष वाढल्यावर या समाजात इस्लामी धर्मांध शक्तींनी डोके वर काढले. जमाते इस्लामी या बंदी घातलेल्या पक्षाच्या कारवाया वाढल्या. हसिनांना हा असंतोष मुत्सद्दीपणे हाताळता आला नाही. त्यांनी अरेरावी व पोलिसी दडपशाही करण्याचा प्रयत्न केला.

## युनूस यांची चलाखी

विरोधी बेगम खलिदा झिया यांच्या बांगला राष्ट्रीय पक्षावर थेट बंदी घालण्यात आली. झिया यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात टाकले गेले. गेल्या जुलैमध्ये हसिना यांच्या सरकारविरुध्दच्या आंदोलनांचा भडका उडाला. त्यावेळी पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. आंदोलकांना ठार मारून त्यांची प्रेते नाहीशी केल्याचे आरोप झाले. शेकडो जणांना तुरुंगात टाकले गेले. त्यामुळे मग पूर्ण देश खवळून उठला व त्याने पंतप्रधानांच्या घरासकट सर्व सरकारी यंत्रणांवर हल्ला केला. हसिनांना परागंदा व्हावे लागले. हसिना यांच्यानंतर घड्याळाचे काटे उलटे फिरवण्यात आले. १९७१ च्या लढाईच्या वेळी बांगला जनतेवर पाकिस्तान लष्कराचे प्रतिनिधी म्हणून ज्यांनी अत्याचार केले त्यांच्यावर हसिना यांनी खटले चालवले होते. पण ते खटले बंद करण्यात आले. मुस्लिम धर्मगुरु इत्यादींचा प्रभाव वाढला. बांगला हिंदूंवर हल्ले सुरू झाले. त्यांची घरे, दुकाने, कार्यालये व देवळे फोडण्यात आली. पाकिस्तानशी सहयोग वाढला. पाकिस्तानी नागरिकांना व्हिसाशिवाय येण्याजाण्याची परवानगी देण्यात आली. हसिना यांच्या जागी हंगामी पंतप्रधान म्हणून आलेले नोबेल पारितोषिक विजेते महंमद युनूस हे या धर्मांध शक्तींच्या हातचे बाहुले असल्याचे वेळोवेळी दिसून आले. गेल्या दीड वर्षात युनूस यांना बांगलादेशाची अर्थव्यवस्था सावरता आलेली नाही. निवडणुका घेण्यासाठी ते पुढचे पुढचे वायदे करीत आहेत. त्यामुळे त्यांच्याही विरोधात असंतोष वाढतो आहे. पुढची सत्ता धर्मांध जमाते इस्लामी व बांगला राष्ट्रीय पक्ष ताब्यात घेणार हे उघड आहे. हसिना यांच्या पक्षाला निवडणूक लढण्यास बंदी घालण्यात आली आहे. आता संतप्त लोकांना शांत करण्यासाठी हसिना यांना फाशी देण्याचा निर्णय मिळवण्यात आला आहे. हा निर्णय देणारा लवाद हा एक मोठा विनोद होता. याच्याशी संबंधित न्यायाधीश हे बांगलादेश नॅशनल पार्टीशी संबंधित असून निःपक्ष सुनावणी झालीच नाही. हसिना यांच्या वतीने वकील जवळपास नव्हताच. होता त्याने कोणाही साक्षीदारांची तपासणी केली नाही. थोडक्यात सर्व खटला एकतर्फी चालवण्यात आला व जनतेच्या मागणीबरहुकूम फाशी सुनावण्यात आली. ही सजा झाली नसती तर लोकांनी चिडून दंगे केले असते. म्हणजे ही लोकाग्रहास्तव फाशी आहे.


## भारतविरोध भडकणार

हसिना यांनी दंडेलशाही केली, भ्रष्टाचार केला व विरोधकांना दडपण्याचा प्रयत्नही केला यात शंका नाही. पण याची शिक्षा म्हणजे फाशी होऊ शकत नाही. लोकशाहीमध्ये त्यांना निवडणुकीच्या मार्गाने दूर करणे व देशात लोकांना अधिक स्वातंत्र्य देणे हाच योग्य पर्याय असतो. यापूर्वीही बांगलादेशात शेख हसिना व त्यांच्या प्रतिस्पर्धी खलिदा झिया यांच्यात सतत संघर्ष होत असत. पण आता बांगलादेश हा पाकिस्तानच्या रस्त्याने निघाला आहे. इतक्या वर्षात हे कधी झाले नव्हते. याचा दुसरा थेट परिणाम असा आहे की, बांगलादेशात भारतविरोधी शत्रुत्वही वाढीस लागणार आहे. हसिनांना आश्रय देण्यामुळे तर भारताविरुध्द आग ओकण्यास तेथील धर्मांधांना निमित्तच मिळणार आहे. पश्चिमेकडे पाकिस्तान, उत्तरेकडे चीन यांच्यासारखे शेजारीवजा शत्रू आधीपासूनच असताना आता पूर्वेकडे बांगलादेशच्या निमित्ताने एक अशांत शेजारी व शत्रू निर्माण होणार आहे. बिहारच्या निवडणुकीत बांगलादेशातून येणाऱ्या कथित घुसखोरांच्या विरोधात प्रचार करण्याचा प्रयत्न नरेंद्र मोदींनी केला. पुढील वर्षी पश्चिम बंगालमध्ये पुन्हा हा मुद्दा उफाळणार आहे. म्हणजे भारताकडूनही बांगलादेशाच्या विरुद्ध शत्रुत्वाची भावना जोपासली जाणार आहे. त्याचा दाखल देऊन बांगला लोकांना आणखी भडकवले जाऊ शकते. पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्याने जैशे महंमद व अल कायदा दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. हे अतिरेकी आता बांगलादेशातून काम करू लागल्याचे सांगितले जाते. दिल्लीतील स्फोटाची सूत्रे बांगलादेशातून हलली असावीत असा एक संशय आहेच. अर्थात याला पुरावे मिळालेले नाहीत. पण बांगलादेशातील संतप्त जनता व भारताला शत्रू दाखवून आपली पोळी भाजून घेणारे सत्ताधीश यामुळे आपल्या पूर्व सीमेवर एक नवाच ज्वालामुखी उभा राहणार आहे. महंमद युनूस हे नोबेल मिळवलेले वगैरे असले तरी सत्तेमुळे त्यांचेही डोके फिरले आहे. मध्यंतरी भारत आणि इशान्य भारत यांच्यातील बांगलादेश सहज तोडू शकतो अशा आशयाची धमकी त्यांनी दिली होती. हा अपघात नव्हता. त्यांना देशातील धर्मांधांना खूष ठेवायचे आहे. शिवाय, चीन, अमेरिका व इतर देशांची फूसही त्यांना असण्याची शक्यता आहे. चीनला नेपाळ व बांगलादेशमध्ये भक्कम पाय रोवायचे आहेत. त्यासाठी सध्याची अशांतता चांगलीच फायद्याची आहे. आता हसिना भारतात असल्याचे निमित्त करून बांगलादेशकडून येणाऱ्या धमक्या येत्या काही दिवसात वाढल्या तर नवल वाटायला नको. या स्थितीत भारताने संयम बाळगायला हवा. शिवाय, देशामध्येही हिंदू विरुध्द मुस्लिम अशा पेटवापेटव्या चालू आहेत त्या बंद करायला हव्यात.

विचार

# क्रिकेटमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

***आज क्रिकेट सामन्याप्रसंगी तसेच नंतर ॲक्शन रिप्ले आणि हायलाईट्सच्या माध्यमातून विशेष क्षणचित्रे उलगडून दाखवली जातात. त्यातूनच नेटकेपणाने न घेतलेला कॅच, बॉलने घेतलेला स्विंग किंवा खेळाडूने सीमारेषेला केलेला- न केलेला स्पर्श याची अचूक माहिती मिळते. या दृष्टीने क्रिकेटमध्ये येत असलेले नवतंत्रज्ञान लक्षवेधी आहे. कुकाबुरा बॉलमधील नवतंत्राने या संदर्भातील नवा अध्याय लिहायला घेतला आहे.***




**डॉ. दीपक शिकारपूर**

क्रिकेट हा खेळ प्राचीन काळापासून खेळला जात असून कालौघात त्यामध्ये अनेक बदल झाले आहेत. एकीकडे खेळाची गती वाढली, तशीच प्रेक्षकांची अपेक्षा आणि निर्णायकतेबाबतची अचूकताही वाढली. या बदलत्या गरजांमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर क्रिकेटमध्ये वाढू लागला. आजच्या घडीला, क्रिकेट सामन्यांमध्ये तंत्रज्ञानाची भूमिका इतकी महत्त्वाची झाली आहे की त्याविना अचूक निर्णय, विश्लेषण किंवा प्रेक्षकांना उच्च दर्जाची अनुभूती देणे अशक्यप्राय झाले आहे. क्रिकेटमध्ये १९९० च्या दशकात तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाला, परंतु त्याचा खरा प्रभाव २००० नंतर दिसून आला. सुरुवातीला हा बदल फक्त थोड्या प्रमाणावर रिप्ले दाखवणे, स्कोअरकार्ड इलेक्ट्रॉनिक करणे इतपत मर्यादित होता. परंतु टीव्ही प्रक्षेपण व्यावसायिक होत गेले, तसे डीआरएस, हॉक-आय, अल्ट्रा एज, बॉल ट्रॅकिंग यांसारख्या प्रगत प्रणाली क्रिकेटचा अविभाज्य भाग बनल्या. आता त्यापुढची पायरी म्हणजे कुकाबुरा स्मार्ट बॉल. आजचा क्रिकेट 'डेटा-ड्रिव्हन' झाले आहे. बॉलचा वेग, स्विंग, बाउन्स, स्पिन हे सर्व डेटा रूपात संकलित करून विश्लेषण केले जाते. याच पार्श्वभूमीवर 'कुकाबुरा स्मार्ट बॉल' हे एक अत्यंत महत्त्वाचे आणि क्रांतिकारी तंत्रज्ञान समोर आले आहे. या बॉलने क्रिकेटमध्ये अचूक मोजमाप, फिटनेस मोजणी आणि डेटा ॲनॅलिटिक्सला नव्या उंचीवर नेले आहे. हल्ली सामन्याप्रसंगी चढाओढ इतकी वाढते की एक एक चेंडू आणि एक एक धाव निर्णायक ठरते. त्यासंदर्भातील निर्णयात थोडीशी चूक झाली तरी चांगले अंपायरींग झाले नाही किंवा पक्षपातीपणा झाल्याच्या तक्रारी चाहत्यांकडून सहज केल्या जातात.

खेळात कटूतेला स्थान नसावे आणि खेळीचे, नियमांचे चोख मूल्यमापन व्हावे या दृष्टीने काही नवी तंत्रे आकाराला येत असल्यास स्वागतच व्हायला हवे. त्या दृष्टीने पाहता कुकाबुरा स्मार्ट बॉल हे तंत्रज्ञानाने क्रिकेटच्या जगात टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे म्हणता येते. हे एक खास तंत्रज्ञान आहे. पारंपरिक खेळाला आधुनिक डेटा ॲनालिटिक्सची जोड देऊन या बॉलने खेळाडूंच्या प्रशिक्षणाची पद्धत, प्रेक्षकांचा सामना पाहण्याचा, रसग्रहण करण्याचा अनुभव आणि सामान्यांच्या निर्णयाचे स्वरूप पूर्णपणे बदलण्याची क्षमता दाखवली आहे. कुकाबुरा स्मार्ट बॉल हा एक विशेष बॉल आहे, ज्यामध्ये अत्याधुनिक सेन्सर टेक्नॉलॉजी वापरली आहे. पारंपरिक बॉलप्रमाणे दिसणारा हा बॉल आतून अत्यंत तंत्रसमृध्द आणि बुद्धिमान आहे. या बॉलमध्ये स्मार्ट चिप्स आणि सेन्सर बसवलेले असतात, जे बॉलच्या प्रत्येक हालचालीची माहिती संकलित करतात. हे तंत्र कुकाबुरा कंपनी आणि स्पोर्टकोर नावाच्या ऑस्ट्रेलियन स्टार्टअपच्या संयुक्त प्रयत्नातून विकसित झाले आहे. बॉलच्या आतमध्ये लपवलेले हे सेन्सर बॉलच्या वेगापासून बॉलिंग ॲक्शनपर्यंत अनेक गोष्टी मोजतात. अशा या कुकाबोरा स्मार्ट बॉलमध्ये नेमके काय असते, याचा वेध घेऊ. त्यात सर्वात महत्वाचे असते ते मायक्रो सेन्सर युनिट. बॉलच्या कोअरमध्ये बसवलेले हे युनिट बॉलचा वेग, गती, फिरकी, बाउन्स यांसारख्या क्रियांचा डेटा संकलित करते. त्याखेरीज असते ते ब्लूटूथ टान्समीटर. हा ट्रान्समीटर बॉलमधून संकलित झालेला डेटा जवळील डिव्हाइस (स्मार्टफोन, टॅबलेट, संगणक) ला वायरलेस पद्धतीने पाठवतो.

या तांत्रिक सक्षमतेमुळे खेळाच्या अनेक टप्प्यांमध्ये नेमकी खेळी तपासून, उलगडून पहायला मदत होते. याखेरीज यात एक लहान बॅटरी असते, जी बॉल अनेक तास वापरला, तरी टिकते. ही बॅटरी बदलता येते किंवा रिचार्ज करता येते. गंमत म्हणजे हा बॉल मोबाईल ॲपशी संलग्न असू शकतो. कुकाबुरा स्मार्ट बॉलसाठी खास ॲप उपलब्ध आहे. यामध्ये बॉलिंग आणि गोलंदाजांची पूर्ण माहिती रिअल-टाइममध्ये दिसते. त्याचे काही प्रमुख फायदे लक्षात घ्यायला हवेत. पहिला महत्वाचा फायदा म्हणजे रिअल टाइम डेटा आणि अचूक विश्लेषण उपलब्ध होणे. पारंपारिक बॉलमध्ये फक्त निरीक्षणावर आणि वेगाची मोजणी करु शकणाऱ्या साधनांवर अवलंबून रहावे लागत होते; पण स्मार्ट बॉलमुळे वेगाच्या प्रत्येक टप्प्यावर, फिरकीचे प्रमाण, सीमची स्थिती, बाउन्स आणि बॉलवरील पॉवर यावर अचूक, डेटा क्षणार्धात मिळतो. प्रशिक्षणात विज्ञानाधारित सुधारणा पहायला मिळते. प्रशिक्षक आणि खेळाडूंना बॉल रिलिज, सीम, स्पिन, बाउन्स आदी तांत्रिक बारीकसारीक गोष्टी उलगडून पाहता येतात. त्यामुळे खेळीमधील त्रुटी ओळखणे, प्रशिक्षण पद्धती वैयक्तिकृत करणे आणि प्रगतीचा मागोवा ठेवणे सोपे जाते. यामुळे कौशल्य सुधारणा साध्य होते. गोलंदाजाला त्याच्या फिरकीचा वेग, गतीतील अचूक फरक आणि चेंडू सोडतानाचा सीमचा कोन लगेच कळतो. यामुळे आपल्या तंत्रात लगेच सुधारणा करता येते. परिणामी, लाईव्ह ब्रॉडकास्टवेळी प्रेक्षकांना खेळातल्या अचूक विश्लेषणाचा अधिक समृध्द अनुभव मिळतो.

या तंत्राने सज्ज होणारी खेळी अचूक माहितीसह समोर येते. किंबहुना, फक्त डोळ्याला दिसणारा सामना पाहण्यापलिकडे जाऊन खेळीची वैशिष्ट्ये, गोलंदाजाची नेमकी कामगिरी आणि एखाद्या खेळाडूने दाखवलेले कसब अनुभवायला मिळते. लाईव्ह सामना पाहताना, बॉलवरून मिळणारी प्रत्येक माहिती, जसे की स्पीड, स्पिन, बाउन्स थेट स्क्रीनवर दिसते. त्यामुळे प्रेक्षकांना सामन्यातील बारकावे आणि खेळाडूचे कौशल्य उत्तम समजते. यामुळे उच्च दर्जाचे अंपायरिंग आणि डीआरएस निर्णय आकाराला येऊ शकतो. इन-बॉल सेन्सर्समुळे माहिती घेण्याच्या प्रक्रियेमध्ये अधिक अचूकता येऊन विश्वासार्हता प्राप्त होते. एलबीडब्ल्यू, कॅच किंवा सीमसंबंधित अगदी बारीक विवादांमध्ये बॉलचा ट्रॅक, बाउन्स वगैरे माहिती अचूक करता येते. हा तपशील विकास आणि तंत्रज्ञानाचा अभूतपूर्व समन्वय ठरतो. डेटा स्टोरेज आणि एआय बेस्ड विश्लेषणाने क्रिकेटमधील विविध संशोधन आणि निर्णय प्रक्रियेत मदत होते. खेळाच्या भूतकाळातील, वर्तमानातील आणि भविष्यकालीन ट्रेंड एकत्र करता येतात. अनेकदा खेळाडू अन्याय झाला (पंचानी चुकीचा निर्णय दिला) म्हणून हताश होतो. आता असे होणार नाही. दिला गेलेला निर्णय शंभर टक्के बरोबरच असेल. पंचांना याचा मोठा फायदा मिळू शकेल. वेस्ट इंडीज प्रीमियर लीग सारख्या स्पर्धांमध्ये त्याचा यशस्वी वापर झाला आहे आणि लवकरच हे तंत्र आयपीएल आणि इतर मोठ्या लीगमध्ये अधिक नियमितपणे दिसू शकते. कुकाबुरा स्मार्ट बॉलचा उपयोग केल्याने क्रिकेट सामन्याच्या प्रत्येक पातळीवर – प्रशिक्षण, सामना, निवड, ब्रॉडकास्ट आणि निर्णय ढाच्यात एक प्रगत, डेटा आधारित आणि विज्ञानाधारित युगाची सुरूवात होईल.

आज अनेक खेळांच्या लिग सुरु झाल्या आहेत. त्यांचे स्वरुप स्थानिक राहिलेले नाही, तर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचले आहे. क्रिकेटसारख्या खेळात तर प्रचंड पैसा गुंतलेला असतो. या खेळांच्या आयोजनात, सादरीकरणामध्ये येत असलेली व्यावसायिकता खास महत्वाची आहे. आज सामना पहायला प्रत्यक्ष येणाऱ्या प्रेक्षकाकडून काही हजार रुपये वसूल केले जातात. ठराविक सामन्याची उत्सुकता माध्यमांच्या मदतीने प्रचंड प्रमाणात वाढवली जाते. अगदी टीव्हीवर सामना पहायचा झाला तरी ॲक्शन रिप्ले आणि हायलाईट्सच्या माध्यमातून सामन्याचा टर्निंग पॉईंट किंवा विशेष क्षणचित्रे खास पध्दतीने उलगडून दाखवली जातात. यातूनच मग कधी तरी नेटकेपणाने न घेतला गेलेला कॅच, गोलंदाजाने फेकल्यानंतर बॉलने घेतलेला स्विंग किंवा खेळाडूने कॅच घेताना किंवा थ्रो अडवताना सीमारेषेला केलेला- न केलेला स्पर्श याची अचूक माहिती मिळू शकते. या दृष्टीने क्रिकेटमध्ये येत असलेले नवतंत्रज्ञान महत्वाचे आणि लक्षवेधी आहे. कुकाबुरा बॉलमधील नवतंत्राने या संदर्भातील नवा अध्याय लिहायला घेतला आहे.

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

# उमेदवारी अर्जांचा पाऊस

**प्रमोद जाधव**

जिल्ह्यातील नगरपरिषदांचा कार्यकाल २०२१ मध्ये संपला. तेव्हापासून नगर परिषदेवर प्रशासकीय राजवट सुरु आहे. प्रशासनाद्वारे शहरांचा कारभार चालविला जात होता. नगरपरिषदांवर पुर्ण वेळ प्रशासन अधिकारी म्हणून मुख्याधिकारी काम पहात होते. नगरपरिषदेची निवडणूक लांबणीवर गेल्याने गेली चार वर्षापासून नगरपरिषदेचा कारभार प्रशासकामार्फत चालत होता. निवडणुका कधी होणार याकडे राजकीय कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर ही उत्कंठा संपली आहे. ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहिर झाले. नगरपरिषदेच्या सदस्य पदांचे आरक्षण बुधवारी(दि.८)ऑक्टोबरला जाहीर करण्यात आले. या आरक्षणामध्ये महिला व पुरुषांना समान संधी देण्यात आली आहे. त्यानंतर निवडणूक कार्यक्रम कधी जाहीर होणार याकडे लक्ष लागून राहिले होते. अखेर ही उत्कंठा संपली आहे. मागील पंधरा दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाने राज्यातील २४६ नगरपरिषद आणि ४२ नगरपंचायतीच्या निवडणूकांचा कार्यक्रम जाहीर केला.रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, रोहा, महाड, श्रीवर्धन, पेण, उरण, माथेरान, खोपोली, व कर्जत या नगरपरिषदाचा त्यामध्ये समावेश आहे. थेट नगराध्यक्ष व सदस्य पदांच्या उमेदवारीचा अर्ज भरण्याची प्रक्रिया १० ते १७ नोव्हेंबरला पुर्ण झाली. उमेदवारी अर्जाची छाननी १८ नोव्हेंबरला झाली. अंतिम उमेदवारी २६ नोव्हेंबरला जाहिर केले जाणार असून त्याच दिवशी चिन्ह वाटप केले जाणार आहे. तसेच मतदान दोन डिसेंबर तर मतमोजणी तीन डिसेंबरला होणार आहे.

जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या दहा नगरपरिषदांच्या थेट नगराध्यक्ष पदासाठी दहा, तर नगरसेवक पदासाठी २१७ जागांसाठी निवडणूक होणार आहे. जिल्ह्यातील दहा नगर परिषदांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया (दि. १०) नोव्हेंबरपासून सुरू झाली आहे. पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाले नाही. दुसऱ्या दिवशी मंगळवारी (दि.११) व तिसऱ्या दिवशी बुधवारी (दि.१२) देखील एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही. परंतु गुरुवारी (दि.१३)चौथ्या दिवशी मुरूडमधील पाच, पेणमधील एक व श्रीवर्धनमधील एक अशा एकूण सात उमेदवारांनी नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले. सोमवारी (दि.१७) शेवटच्या दिवशी नगरसेवक पदासाठी ५२० आणि नगराध्यक्ष पदासाठी ३६ उमेदवारी अर्ज दाखल केले. गेल्या सहा दिवसांमध्ये ९५९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यात ९०० नगरसेवक व ५९ नगराध्यक्ष पदासाठी अर्ज प्राप्त झाले आहेत. खोपोली नगरपरिषदेमध्ये नगरसेवक पदासाठी १८८, नगराध्यक्ष पदासाठी सात अर्ज दाखल झाले आहेत. अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी सहा व नगरसेवक पदासाठी ७५ अर्ज भरण्यात आले आहेत. श्रीवर्धनच्या नगराध्यक्ष पदासाठी पाच आणि, नगरसेवक पदासाठी ६८ अर्ज दाखल झाले आहेत. मुरूड-जंजिराच्या नगरसेवक पदासाठी ७४ व नगराध्यक्ष पदासाठी पाच अर्ज दाखल झाले आहेत. रोह्याच्या नगराध्यक्ष पदासाठी तीन व सदस्य पदासाठी ७८ अर्ज दाखल झाले आहेत. महाडमध्ये नगराध्यक्ष पदासाठी सात व नगरसेवक पदासाठी ७४ अर्ज दाखल झाले आहेत. पेणमध्ये नगराध्यक्ष पदासाठी पाच अर्ज दाखल झाले असून नगरसेवकपदासाठी १०३ अर्ज प्राप्त झाले आहेत. उरणमध्ये नगरसेवक पदासाठी ७८ व नगराध्यक्षपदासाठी नऊ अर्ज दाखल झाले आहेत. कर्जतमध्ये नगरसेवक पदासाठी ९२ तर नगराध्यक्ष पदासाठी आठ अर्ज दाखल झाले आहेत. माथेरानमध्ये नगरसेवक पदासाठी ७० तसेच नगराध्यक्ष पदासाठी चार अर्ज प्राप्त झाले आहेत. या निवडणूकीत २१७ नगरसेवकाच्या जागांसाठी ९०० अर्ज आणि दहा नगराध्यक्ष पदासाठी ५९ अर्ज वेगवेगळया राजकीय पक्षामार्फत भरण्यात आले आहे. काहींनी अपक्ष अर्जदेखील भरले आहे. त्यामुळे ही निवडणूक दुरंगी, तिरंगी तसेच चौरंगी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जागांपेक्षा उमेदवारी अर्ज चार ते पाच पटीने अधिक आले आहेत. शेवटच्या दिवशी सोमवारी एका दिवसात ५२० नगरसेवक पदासाठी आणि ३६ नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे मागील पाच दिवसांच्या तुलनेत शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्जांचा पाऊस पडल्याचे चित्र दिसून आले आहे. जिल्ह्यात एकूण १०७ प्रभाग असून दोन लाख ३७ हजार ५०३ मतदार आहेत. ३०८ मतदान केंद्रावर दोन डिसेंबरला मतदान होणार आहे. त्यामुळे कोणाच्या पारड्यात किती मते पडली हे तीन डिसेंबरला समजणार आहे. निवडणूक प्रकीया सुरळीत पार पाडण्यासाठी महसूल, नगरपरिषद प्रशासनामार्फत कामकाज सुरु करण्यात आले. या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, निवडणूक प्रकिया शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनानेदेखील कंबर कसली आहे.

लोकसंसद

## 'कॅराकल'च्या दर्शनामुळे वन्यजीव प्रेमींमध्ये आनंदाची लहर!



एकीकडे राज्यभरात भरमसाठ संख्येने वाढलेल्या मार्जार कुळातील प्राणी बिबळ्यांनी उच्छाद मांडला असताना त्यावर नियंत्रण आणण्यासाठी वन्यविभाग विविध उपाययोजना राबवत आहे तर दुसरीकडे मार्जार कुळातीलच पण देशातून लुप्तप्रय होऊ घातलेली आणि देशात अवघी ७० ते ८० संख्या असलेली दुर्मिळ आशियाई कॅराकल (लांब कानाची जंगली मांजर) राजस्थानच्या जैसलमेरमधील रामगड येथे आढळून आली आहे. दोन महिन्यांपूर्वी रामगड येथील एका शिक्षकाला दुर्मिळ कॅराकल या वन्य मांजरीचे पिल्लू सापडले होते. नंतर त्यांनी त्याची छायाचित्रे घेऊन ते त्याच्या नैसर्गिक अधिवासात, जंगलात परत सुरक्षितपणे सोडून दिले आणि आता मुंबईच्या 'बीएनएचएस' या संस्थेने स्थानिकांना सोबत घेऊन तेथे राबवलेल्या एका शोध मोहिमेत या वन्य मांजरीचे पुन्हा दर्शन झाले आहे. प्रामुख्याने आफ्रिका, मध्य आशिया आणि वायव्य भारतात आढळणारी आणि मजबूत बांधणी, लांब पाय, लहान चेहरा, कुत्र्यासारखे लांब दात, लांब कान, तुलनेने लहान शेपटी असलेली कॅराकल ही एक वन्य मांजर आहे. चपळतेसाठी ओळखली जाणारी कॅराकल भक्ष्य पकडण्यासाठी हवेत चक्क ११ फूट उंचीपर्यंत उडी मारू शकते. कॅराकलच्या दर्शनामुळे वन्यजीव प्रेमींमध्ये आनंदाची लहर उमटली असून भारतातील लुप्त होत चाललेल्या वन्यजीवांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी नवी आशा आशा निर्माण झाली आहे. **–प्रदीप अनुसया शंकर मोरे,** अंधेरी

दिनविशेष

# क्रांतिकारकांची स्फूर्तिदेवता राणी लक्ष्मीबाई

राणी लक्ष्मीबाई ही केवळ एक महान वीरांगना नाही तर त्या सर्व महिलांसाठी आदर्श आहेत. देशाच्या पहिल्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राणी लक्ष्मीबाईंच्या शौर्याने आश्चर्यचकित होऊन इंग्रजांनी त्यांचे कौतुक केले होते, असे सांगितले जाते.

राणी लक्ष्मीबाई यांचा जन्म १९ नोव्हेंबर १८२८ रोजी काशीतील वाराणसी येथील अस्सीघाट येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मोरोपंत तांबे आणि आईचे नाव भागीरथीबाई होते. त्यांचे बालपणीचे नाव ममणिकर्णिकाफ होते, पण मणिकर्णिकाला प्रेमाने ममनुफ म्हणत. मनू अवघ्या चार वर्षांची असताना तिची आई वारली. त्यानंतर मग मोरोपंत मनूसोबत झाशीला गेले. राणी लक्ष्मीबाईंनी त्यांचे बालपण आजोबांच्या घरी घालवले. जेथे त्यांना छबिली म्हणूनही ओळखले जात होते. १२ वर्षांची असताना त्यांचा विवाह झाशीचे राजे गंगाधर राव यांच्याशी झाला. लग्नानंतर मनुचे नाव लक्ष्मीबाई ठेवण्यात आले. राणी लक्ष्मीबाई यांच्या लग्नानंतर त्यांच्या झाशी या राज्याची आर्थिक स्थिती मोठया प्रमाणात सुधारली. राणी लक्ष्मीबाई या समीकरण आणि शस्त्रास्त्रांमध्ये अत्यंत कुशल होत्या. त्यांनी झाशीच्या किल्ल्याच्या एक महिला सैन्य उभे केले होते. त्या स्वतः मर्दानी पोशाख परिधान करुन फेरफटका मारत असत. हे सर्व पाहून त्यांचे पती राजा गंगाधररावांना खूप कौतुक वाटे. पुढे काही काळानंतर राणी लक्ष्मीबाई गरोदर राहिल्या त्यांनी मुलाला जन्म दिला. पण काही महिन्यांनी ते बाळ मरण पावले. आपल्या राजगादीचा वारस असा लहानपणीच निर्मित्याने हिरावून घेतला. यामुळे संकटांचा डोंगर गंगाधररावांवर कोसळला. आणि दुःखी झालेल्या गंगाधररावांनी २१ नोव्हेंबर १८५३ रोजी आपले प्राण सोडले. राजांच्या जाण्यामुळे झाशी दुःखात बुडाली आणि याचवेळी इंग्रजांनी त्यांच्या कुटील धोरणाचा अवलंब करुन झाशीवर हल्ला केला. यावेळी मग राणी लक्ष्मीबाई यांनी तोफांशी लढण्याची रणनीती आखून आपल्या विश्वासू लोकांना तोफखान्याचे नेतृत्व करण्यासाठी पाठवले. शत्रूचा पराभव करण्यासाठी गडावरील कडक बिजली, घनगर्जन, भवानीशंकर इत्यादी तोफांचा वापर केला.

लक्ष्मीबाईंची तटबंदी पाहून ब्रिटीश सेनापती हुरोज थक्क झाला. राणी रणचंडीचे खरे रूप धारण करून ती आपला दत्तक पुत्र दामोदरराव यांना पाठीवर घेऊन भयंकर युद्ध लढत राहिली. या लढाईत झलकारीबाई आणि मुंदर सखींनीही रणांगणात आपले मोठे कौशल्य दाखवले. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेक महिला क्रांतिकारी होऊन गेल्या ज्यांनी मायभूमीसाठी त्यांच्या प्राणाची आहूती वाहिली. त्या पैकी एक महत्त्वपूर्ण आणि प्रभावशाली व्यक्तीमत्त्व म्हणजे झाशीची राणी लक्ष्मीबाई. मणिकर्णिका अर्थात लक्ष्मीबाई यांनी इंग्रजापुढे न झुकता स्वातंत्र आणि स्वाभिमानाचा लढा दिला. झाशीची गादी सांभाळून नेतृत्व करणाऱ्या झाशीची राणी या आजही सर्वांसाठी एक आदर्श आहेत. १६ जून १८५८ रोजी ग्वाल्हेरजवळील कोट्याच्या लढाईत राणी लक्ष्मीबाईंनी शेवटपर्यंत लढा दिला.

आजच्या दिवशी १८५८ साली त्यांचा रणांगणातच त्यांना वीरमरण आले. राणी लक्ष्मीबाईंनी बालपणीच सिद्ध केले की त्या एक उत्तम सेनापतीच नाही तर एक कार्यक्षम प्रशासकही आहे. त्या महिला सक्षमीकरणाच्या बाजूनेही होत्या. त्यांनी आपल्या सैन्यात महिलांची भरती केली होती. आज काही लोक जे स्वत:ला महिला सशक्तीकरणाचे नेते म्हणवतात ते महिलांना सैन्यात पाठवण्याच्या विरोधातही आहेत. पण या सगळ्यासाठी राणी लक्ष्मीबाई हे उत्तम उदाहरण आहे. की महिलांची इच्छा असेल तर त्या कोणतेही पद मिळवू शकतात.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१९ नोव्हेंबर**

१) श्रीम.निर्मला मनोहर भगत पिंपळभाट, अलिबाग १९-११-१९५४

२)श्रीम.अनुजा राजेंद्र पाटील कामतआळी, अलिबाग दि.१९-११-१९१३

## मजुराची हत्या

**मुंबई :** व्ही.पी. रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुकानामध्ये काम करणाऱ्या एका मजुराने दुसऱ्या मजुराची निर्घृण हत्या केल्याची घटना घडली. गिरगावच्या ७वी खेतवाडी येथील तळ अधिक एक अशी एकाच मालकाची दुकाने असून एक मजूर खालच्या तर दुसरा मजूर वरच्या मजल्यावर काम करत होता. शिवाय दोघेही जण वरच्या दुकानात राहत होते असे समजते. दरम्यान सोमवारी सकाळी एक मजूर त्या ठिकाणी मृतावस्थेत आढळून आला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# हजारो घरकुलांचे हप्ते रखडले

## • शासनाच्या उदासीन धोरणामुळे लाभार्थ्यांमध्ये नाराजी

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

**प्रधानमंत्री आवास योजना व जनमन आवास योजनेतील घरकुल लाभार्थ्यांचा दुसरा, तिसरा व चौथा हप्ता शासनाकडे अडकल्यामुळे शहापूर तालुक्यातील तब्बल आठ हजार ६५८ घरकुले रखडली आहेत. हप्ता मिळण्यासाठी गेल्या एक महिन्यापासून शासन दरबारी येरझाऱ्या घालणाऱ्या लाभार्थ्यांची अक्षरशः दमछाक झाली आहे. शासनाच्या या उदासीन धोरणामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून सिमेंट, विटांची उसनवारी फेडण्यासाठी रोजगाराच्या शोधात त्यांनी स्थलांतर सुरू केले आहे.**



शहापूर तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींमध्ये प्रधानमंत्री व जनमन आवास योजनेंतर्गत नऊ हजार ७२८ घरकुले एक वर्षांपूर्वी मंजूर झाली आहेत. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांसाठी चार हप्त्यांमध्ये एक लाख २० हजार, तर जनमन आवास योजनेतील घरकुलांसाठी दोन लाख रुपये तीन हप्त्यांमध्ये आवश्यक ती प्रक्रिया पार पडल्यानंतर कामाच्या स्थितीनुसार लाभार्थ्यांना देण्यात येतात. पहिला हप्ता आठ हजार ९८४ लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आल्यानंतर जोते पूर्ण झाल्यावर दुसरा हप्ता, भिंती उभ्या केल्यानंतर तिसरा व छताचे काम पूर्ण झाल्यावर चौथा हप्ता थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येतो. वर्षभरापूर्वी मंजूर झालेल्या प्रधानमंत्री व जनमन आवास योजनेतील आठ हजार ९८४ लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर शासनाकडे निधी उपलब्ध नसल्याने दुसरा, तिसरा व चौथा हप्ता रखडला आहे.

### हक्काचा निवारा वाऱ्यावर

जनमन आवास योजनेतील कातकरी समाजाच्या लाभार्थ्यांनी उघड्या छताखाली हप्त्यांची वाट बघितली. मात्र हप्ता न मिळाल्यामुळे निराश झालेल्या लाभार्थ्यांनी मोलमजुरी करून पोटाची भूक भागवण्यासाठी स्थलांतर सुरू केले आहे. घरकुलाचे काम अपूर्ण सोडून लाभार्थी स्थलांतर करू लागल्याने त्यांचा हक्काचा निवारा वाऱ्यावर आला आहे. त्यांच्या घराचे काम पूर्ण होण्यात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

### घरकुले अपूर्ण अवस्थेत

घरकुल मंजूर झाल्यानंतर अनेकांनी आपले जुने घर पाडून तिथे नवीन बांधकाम सुरू केले. मात्र हप्ते लटकल्याने या घरकुलांची कामे बंद झाली आहे. घरकुले अपूर्ण अवस्थेत उभी आहेत. परिणामी या गोरगरीबांचे संसार उघड्यावर पडले आहेत. घरकुलांचे हप्ते तातडीने द्या, असा टाहो या लाभार्थ्यांनी फोडला आहे.

## निवडक

### वालोटी नं.१ शाळेला संगणक भेट




**चिपळूण :** सामाजिक बांधिलकी जपत घरडा केमिकल्स लिमिटेड लोटे यांनी आपल्या सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा, वालोटी नं.१ यांना संगणक संच भेट देऊन शैक्षणिक उन्नतीसाठी मोलाचे पाऊल उचलले आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, संगणकाधारित शिक्षणाची संधी मिळावी आणि डिजिटल शिक्षणाचा दर्जा उंचावावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कंपनीचे बी.एस पवार यांनी मुख्याध्यापक संतोष कादवडकर व अमर पवार यांच्या उपस्थितीत संगणक संच सुपूर्द केला. या संगणकामुळे विद्यार्थ्यांना ई-लर्निंग, ऑनलाईन शैक्षणिक साधनांचा वापर, तसेच मूलभूत संगणक कौशल्ये आत्मसात करण्यास मदत होणार आहे. शाळेला संगणक मिळवून देण्यासाठी संजय कमलाकर सुर्वे यांचे विशेष सहकार्य लाभले. याप्रसंगी शाळेच्या शिक्षकवर्गाने आणि ग्रामस्थांनी घरडा केमिकल्स लिमिटेडचे मनःपूर्वक आभार मानले.

### जॉबच्या नावाखाली ऑनलाईन फसवणूक

**ठाणे :** गेल्या काही वर्षांपासून ऑनलाईन टास्क जॉब देतो असे सांगून अनेकांची फसवणूक होत असल्याचे प्रकार उघडकीस येत आहे. ठाणे जिल्ह्यात राहणाऱ्या एका नोकरदार तरुणाचीही अशाच प्रकारे तब्बल १३ लाखाहून अधिक रुपयांना फसवणूक झाली आहे. याप्रकरणी ठाण्यातील राबोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. शहापूर तालुक्यात ३८ वर्षीय व्यक्ती राहतात. ते ठाण्यातील गोकुळनगर भागातील एका कंपनीत कामाला आहेत. ते टेलेग्राम हे समाजमाध्यमावरील एक ॲप वापरतो. सुमारे दोन महिन्यांपूर्वी त्यांना 'माया' नावाने एक संदेश प्राप्त झाला. त्यामध्ये पार्ट टाईम जॉबच्या माध्यमातून अवघ्या दोन ते तीन तासांत १५०० ते २००० रुपये कमविता येणार असल्याचे म्हटले होते. तरुणाने पार्ट टाईम जॉबची गरज असल्याचे सांगितल्यानंतर त्याच्याकडून संदेशाद्वारे त्याची माहिती मागविण्यात आली. दुसऱ्याच दिवसापासून तरुणाला वेगवेगळे टास्क ऑनलाईनरित्या मिळू लागले होते. त्याला नफा मिळत असल्याचेही दाखविले गेले होते. टास्क पूर्ण करण्यासाठी काही रक्कम तरुणाला भरायची असे. त्यामुळे त्याने टप्प्या-टप्प्याने महिन्याभरात १३ लाख ६५ हजार ५७६ रुपये संबंधित कंपनीने दिलेल्या ॲपवर ऑनलाईनरित्या विविध बँक खात्यात पाठविले होते. तरुणाने पैसे पाठविल्यानंतर बँक खाती त्या ॲपमधून आपोआप रद्द होत होती. त्याला दर्शविण्यात आलेला नफा काढायचा असल्याने त्याने पैसे काढण्याचा प्रयत्न केला. परंतु ते पैसे काढता येत नव्हते. याबाबत त्याने विचारणा केली असता, ५० टक्के रक्कम भरण्याची मागणी त्याच्याकडे करण्यात आली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने याप्रकरणी ठाण्यातील राबोडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

### फसवणूक करणाऱ्या महिलेला अटक




**मुंबई :** नेपाळी जोडप्याची फसवणूकप्रकरणी एका महिलेला कांदिवली पोलिसांनी अटक केली. अटक महिला ही एका खासगी कंपनीत सिनिअर व्हिसा कॉन्सलर म्हणून काम करत होती. तक्रारदार हे नेपाळचे रहिवासी आहेत. त्याच्या पत्नीला लंडन येथे नोकरी करायची होती. त्यासाठी तिच्या नोकरीसह व्हिसा आणि स्वतःच्या डिपेंडंट व्हिसासाठी ते प्रयत्नशील होते. तक्रारदार यांना सोशल मीडियावर एक जाहिरात दिसली. ती कंपनी परदेशातील विविध देशांत नोकरीसह व्हिसा दिल्याचे फोटो आणि व्हिडीओ दिसले. त्यामुळे त्याने त्या कंपनीला संपर्क साधला. संपर्क साधल्यावर कॉन्सलर आणि एकाने त्या जोडप्याला नोकरीसह व्हिसा देण्याचे आश्वासन देत त्याच्याकडून २७ लाख ४४ हजार रुपये घेतले. पैसे घेतल्यानंतर त्यांना नोकरी आणि व्हिसा देण्यात आला नाही. त्याबाबत विचारणा केली असता ते टाळाटाळ करत होते. काही दिवसांनी त्या कार्यालयाला टाळे दिसले. हा प्रकार लक्षात येताच त्यांनी कांदिवली पोलीस ठाण्यात धाव घेतली.

### कर्जतमध्ये ३८ नामनिर्देशन पत्र अवैध

**कर्जत :** कर्जत नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी एकूण शंभर नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आली होती. माजी नगरसेविका शीतल लाड यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचकाची सही नसल्याने त्यांचा अर्ज अवैध ठरला. तसेच अजून ३७ नामनिर्देशन पत्र अवैध ठरली म्हणजे एकूण ३८ नामनिर्देशन पत्र अवैध ठरली. त्यामुळे प्रत्यक्षात नगराध्यक्ष पदासह ६२ उमेदवारांची नामनिर्देशन पत्र वैध ठरली आहेत. यामध्ये पाच नगराध्यक्ष पदासाठी तर ५७ नगरसेवक पदासाठीचे उमेदवार आहेत. प्रभाग दोनमधून अर्ज दाखल केलेल्या माजी नगरसेविका शीतल लाड यांच्या अर्जावर सुचकाची सही नसल्याने त्यांचा अर्ज अवैध ठरला. त्यांनी कर्जत परिवर्तन विकास आघाडीमधील राष्ट्रवादीकडून अर्ज दाखल केला होता. प्रभाग सहामधून प्रशांत पाटील यांनी कर्जत परिवर्तन विकास आघाडीकडून राष्ट्रवादीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर शिवसेना ठाकरे गटाचा ए बी फॉर्म जोडल्याने त्यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरला. म्हणून ते निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. मात्र त्यांना पक्षाची निशाणी मिळणार नाही. सध्या ६२ उमेदवारांची नामनिर्देशन पत्र वैध ठरली असली तरी १९ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज मागे घेण्यात येणार आहे. त्यानंतरच प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात कोण असेल हे स्पष्ट होईल.

### कफ सिरपच्या साठ्यासह दोघांना अटक

**भिवंडी :** औषधी कफ सिरपच्या बाटल्यांची बेकायदेशीर विक्री आणि वाहतूक करणाऱ्या दोन आरोपींना शांतीनगर पोलिसांनी अटक केली आहे. सैफुद्दीन इब्राहिम कपासी (५२) आणि दानिश शहा अन्सारी (३५) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून ऑटोरिक्षा, रोख रक्कम, मोबाईलसह एकूण दोन लाख २५ हजार २५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस पथक रविवारी (दि.१६) चाविंद्रा रस्त्यावरील सोनाबाई कंपाउंडजवळ गस्त घालत असताना, हे दोन्ही आरोपी एका रिक्षामधून (क्र. एमएच ०४ केएक्स २९६५) संशयितरीत्या वाहतूक करताना आढळले. त्यांची तपासणी केली असता त्यांच्याकडे कोडीन फॉस्फेट आणि ट्रीप्रोलीडीन एचसीएल या कफ सिरपच्या बाटल्यांचे तीन बॉक्स आढळले. या बॉक्समध्ये ७७ हजार ८५० रुपये किमतीच्या एकूण ३४६ बाटल्या होत्या. हे सिरप मानवी शरीरास हानिकारक व गुंगीकारक असल्याचे माहीत असूनही ते बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी नेत असल्याचे तपासात उघड झाले. शांतीनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे.

## फार्मर आयडीअभावी बागायतदार अडचणीत

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

आंबा बागायतदाराकडून पाच ते दहा वर्षांच्या कराराने तरुण उद्योजक आंब्याच्या बागा घेतात. त्या बदल्यात आंबा उद्योजक रितसर करार करतात. त्या कराराच्या आधारे पीकविमा काढतात; मात्र त्याला फार्मर आयडीची अट असल्यामुळे कराराने बागा घेणाऱ्यांना पीकविमा काढता येत नसल्याचे पुढे आले आहे.

आंबा पीकविमा काढण्यासाठी नोव्हेंबर अखेरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. अनेक आंबा व्यावसायिक कराराने बागा घेतात. त्याचा पीकविमा काढण्यासाठी ते बँकांमध्ये गेले असता त्यांना फार्मर आयडीची अट असल्याचे सांगितले जाते. संबंधित



उद्योजकांकडे स्वतःच्या नावावर सात-बारा नसल्याने फार्मर आयडी मिळत नाही; मात्र करार हातात असतो त्यामुळे बागेचा करार असून, फार्मर आयडी नंबर नसल्याने काही उपयोग होत नाही.

यापूर्वी नोटरीकडील करार बँकेत ग्राह्य मानला जात होता; मात्र मागील वर्षापासून तो नोंदणी केलेला असावा, अशी अट घालण्यात आली. असे असतानाही फार्मर आयडी नसल्यामुळे आंबा व्यावसायिकांना पीकविमा योजनेचा लाभ घेण्यात अडचणी येत आहेत. निसर्गाच्या अवकृपेमुळे आंबाबागांचे नुकसान होत आहे; मात्र आंबा पीकविमा असल्यामुळे नुकसान झाल्यास काही ना काही नुकसानभरपाई आंबा बागायत, शेतकरी यांना मिळते. मात्र, आंबाबागांचे सात-बारा करार हातात असूनही आंबा पीकविमा काढता येत नसल्यामुळे करारधारक आंबा व्यापारी अडचणीत आहेत. यावर काहीतरी उपाययोजना करावी, अशी मागणी आंबा व्यापारी यांनी केली आहे.

## फिरत्या दवाखान्याद्वारे आरोग्य तपासणी

**मुंबई :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे फिरता दवाखान्याच्या माध्यमातून नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना वैद्यकीय सल्ला देण्यात आला. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण ही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शिकवण आहे. या माध्यमातून तळागाळातील नागरिकांच्या आरोग्याच्या समस्येवर उपचार करता यावे, यासाठी शिवसेना नेते-खासदार अनिल देसाई यांनी दक्षिण मुंबईच्या नागरिकांसाठी फिरता दवाखाना सुरू केला. हजारो रुग्णांची यातून आरोग्य तपासणी करण्यात आली.

## बसस्थानकातील स्वच्छतागृहांची दुरवस्था

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मंडणगड बसस्थानक परिसरातील एकमेव सार्वजनिक स्वच्छतागृह अनेक महिन्यांपासून अत्यंत बिकट स्थितीत आहे. त्याकडे आगार व्यवस्थापनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

तालुक्यातून येणारे ग्रामीण प्रवासी तसेच दापोली, खेड, महाड, मुंबई व पुणे येथून येणाऱ्या नागरिकांना या समस्याग्रस्त स्वच्छतागृहाचा वापर करावा लागत आहे. स्वच्छतागृहातील पाण्याच्या जोडण्या तुटल्या असून, पाणीपुरवठा पूर्णपणे बंद आहे. सिंक व नळ तोडून टाकण्यात आले आहेत तर दोन्ही स्वच्छतागृहांचे दरवाजेही तुटून पडले आहेत. गेल्या कित्येक दिवसांपासून स्वच्छतागृहाची कोणतीही स्वच्छता झालेली नाही. या सर्व कारणांमुळे परिसरात घाण, दुर्गंधी आणि अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आह. तसेच, स्वच्छतागृहातील सांडपाणी शोषखड्ड्यातून व्यवस्थित जिरत नसल्यामुळे टाकी ओसंडून वाहत आहे. दूषित पाणी परिसरात पसरत असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर धोका उद्भवला आहे. स्थानिक नगरपंचायत, खासदार आणि आमदारांनी स्वच्छतागृहासाठी निधी उपलब्ध करण्याचे अनेक प्रयत्न केले असतानाही स्थानिक आगार व्यवस्थापनाने कायदेशीर कारणे पुढे करून सर्व प्रस्तावांना नकार दिला आहे.

## कोपरीत नऊ दुचाकी पेटवल्या

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

कोपरीत काही समाजकंटकांनी रात्रीस खेळ सुरू केला आहे. मोकळ्या मैदानात पार्क केलेल्या तब्बल नऊ दुचाकी अज्ञात इसमांनी पेटवल्याची ही घटना सोमवारी पहाटे चार ते सव्वाचार वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत सर्व दुचाकी जळून खाक झाल्या आहेत. सुदैवाने त्या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. स्थानिक कोपरी पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे. कोपरीच्या गांधीनगर येथील मोकळ्या मैदानात लावलेल्या वाहनांना आग लागल्याची माहिती मिळताच घटनास्थळी ठाणे महापालिका अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली. तसेच स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करून २० मिनिटांत आग नियंत्रणात आणली. या आगीच्या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसली तरी मैदानात उभ्या केलेल्या नऊ दुचाकी पूर्णपणे जळून नुकसान झाले आहे.

## बावशेवाडीतील बॅनर ठरतेय चर्चेचा विषय

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

शहरातील बावशेवाडी परिसरातील वाढत्या कचरा समस्येवर उपाय म्हणून एका तरुणाने राबवलेल्या अनोख्या उपक्रमाची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. बावशेवाडी येथील आकाश कांबळे या सामाजिक भान असलेल्या युवकाने गुहागर बायपास मार्गावरील रस्त्याशेजारी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात असल्याची वारंवार तक्रार केली होती. वारंवार विनंती करूनही परिस्थितीत सुधारणा होत नसल्याने यावर नामी




शक्कल म्हणून आकाशने याठिकाणी 'मी गाढव आहे, कचरा येथेच टाकणार' अशा आशयाचा बॅनर लावला आहे. त्यामुळे याठिकाणी कचरा टाकणाऱ्यांना जणू चांगली चपराकच बसली आहे.

अनेकदा समज देऊनही काही नागरिकांनी याठिकाणी कचरा टाकण्याची सवय सोडली नव्हती. अखेर स्वतः पुढाकार घेत आकाशने स्वखर्चातून जेसीबीच्या मदतीने रस्त्यालगत साचलेला कचऱ्याचा ढीग हटवून संपूर्ण परिसर स्वच्छ केला. परंतु स्वच्छता मोहिमेनंतरही काही बेफिकीर लोक पूर्वापार सवयीप्रमाणे पुन्हा त्या जागीच कचरा टाकू लागले. वारंवार विनंती करूनही परिस्थितीत सुधारणा दिसत नसल्याने आकाशने नागरिकांना चाप बसेल अशा पद्धतीने जाणीव करून देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मी गाढव आहे. मी इथेच कचरा टाकणार. आकाश कांबळेच्या अनोख्या मोहिमेची जोरदार चर्चा आहे. मी इथेच कचरा टाकणार, असा मुद्दाम टोमणेबाज व उपरोधिक आशय असलेला मोठा बॅनर त्याने त्या ठिकाणी लावला. या बॅनरवर कचरा टाकणाऱ्यांना जागृतीचा संदेश देत दंडाचीही सूचना करण्यात आली आहे. हा बॅनर पाहताच अनेक नागरिकांमध्ये मजेशीर चर्चा असून सोशल मीडियावर तो व्हायरल झाला आहे.

## पालघर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

### चोरीला गेलेला कोट्यवधींचा ऐवज जप्त

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर शहरामधील नाकोडा ज्वेलर्समध्ये घातलेल्या दरोड्यात तब्बल ३ कोटी ७२ लाखांचा ऐवज चोरीला गेला होता. मात्र, पालघर पोलिसांनी केवळ ४८ तासांत गुन्हेगारांना अटक केली आहे. गुजरातमार्गे नेपाळकडे पळ काढणाऱ्या आरोपींचा माग काढत भारत-नेपाळ सीमेवरून चार आरोपी, तर सुरतमधून आणखी एक आरोपी अशा एकूण पाच आरोपांनी अटक करण्याची धडाकेबाज कामगिरी पालघर पोलिसांनी केली. शिवाय त्यांच्याकडून तब्बल ३ कोटी २८ लाख १८ हजार ४५० रुपये किंमतीचे सोने, चांदी आणि रोख रक्कम जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

या संदर्भात नाकोडा ज्वेलर्सचे पियुष जैन यांनी तक्रार दिली होती. त्यांचे नाकोडा ज्वेलर्सचे दुकान ८ नोव्हेंबर रोजी रात्री बंद केले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी शेजारील दुकानाचे शटर तुटलेले दिसून आले. त्यानंतर तपास केला असता, सामाईक भिंतीत होल पाडून चोरांनी आत प्रवेश केला आणि गॅस कटरने तिजोरी कापून ५ किलो ४२० ग्रॅम सोने, ४० किलो चांदी आणि २० लाख रुपये चोरून नेल्याचे उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज पाहिले आणि मॉलचे वॉचमन दीपक सिंग आणि नरेश हे गुन्ह्यात सहभागी असल्याचे स्पष्ट झाले.

तांत्रिक तपासातून आरोपी नेपाळचे नागरिक असल्याचे समोर आले. ते गुजरातमार्गे नेपाळला पळून गेल्याचे उघड झाले. त्यानंतर पोलिसांची पथके गुजरात आणि उत्तर प्रदेशमधील खेरी येथे नेपाळ सीमेजवळ रवाना केली. तेथील सुरक्षा यंत्रणेच्या मदतीने आरोपी दीपक नरबहादूर सिंग, भुचनसिंग चेलाऊने, जीवनकुमार थारु, खेमराज देवकोटा यांना सीमा तपासणीदरम्यान अटक करण्यात आली, तसेच सुरत येथून अर्जुन दामबहादूर सोनी याला ताब्यात घेण्यात आले. अशा एकूण ५ आरोपींना अटक करण्यात आली. या आरोपींकडून एकूण ३ कोटी २८ लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

## मनोरंजनातून मिळणार विज्ञानाचे धडे

**। भाईंदर । प्रतिनिधी ।**

मनोरंजनातून आधुनिक विज्ञानाची ओळख मुलांना व्हावी, त्यांच्या जिज्ञासेला चालना मिळावी या उद्देशाने भाईंदर येथील बाळासाहेब ठाकरे कला दालनात महापालिकेकडून विज्ञान केंद्र उभारण्यात आले आहे. याचे लोकार्पण परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यासाठी लागणारा निधी राज्य शासनाकडून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उपलब्ध करून दिला आहे. या अंतर्गत आर्ट गॅलरी, गेम झोन, अभ्यासिका आदींची सुविधा तयार करण्यात आली आहे. त्यात आता आणखी भर म्हणून एका खोलीत नव्याने विज्ञान केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रात लहान मुलांना एआय प्रणालीद्वारे अंतराळातील घडामोडी, ग्रहांचे गुरुत्वाकर्षण, तसेच विविध वैज्ञानिक प्रयोग प्रत्यक्ष करून अनुभवता येणार आहेत.

**११४ वाड्यांचे सौर ऊर्जेद्वारे शाश्वत विद्युतीकरण | डॉ. सचिन शिगवण यांचा पुढाकार**


# ग्रामीण भागात पसरला विकासाचा नवा उजेड

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूण आणि संगमेश्वर तालुक्यात ३१० सौर पथदिव्यांच्या स्थापनेद्वारे १२ गावांतील ११४ वाड्यांचे शाश्वत विद्युतीकरण यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे. या अभिनव उपक्रमामुळे हजारो ग्रामीण नागरिकांच्या जीवनात सुरक्षितता, प्रकाश आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

हा प्रकल्प निर्मिती फाउंडेशन आणि ग्रीन इंडिया इनिशिएटिव्ह प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला आहे. संपूर्ण भारतात 'द सोलार मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे डॉ. सचिन यशवंत शिगवण यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली हा उपक्रम ३ नोव्हेंबर २०२५ रोजी सुरू होऊन १५ नोव्हेंबर २०२५ रोजी यशस्वीरित्या पूर्ण झाला.





या प्रकल्पांतर्गत चिपळूण तालुक्यातील मांडकी खुर्द, पालवण, आगवे, वीर, देवपाट, तोंडली, नायशी, वडेरु आणि पेढांबे ही गावे तसेच संगमेश्वर तालुक्यातील आंबव, नारडुवे आणि शिरंबे ही गावे सहभागी होती. ग्रीन इंडिया इनिशिएटिव्हच्या तांत्रिक टीमने सुयोग गंगावणे, इंजिनीर मोहित वैद्य, इंजिनीर अनुप राजमाने, सिनियर श्री दिलीप घाणेकर ईतर सहकारी सुरज, आर्यन आणि आयुष यांनी प्रत्येक गावाचे सर्वेक्षण करून आवश्यक आणि योग्य ठिकाणी सौर पथदिव्यांची स्थापना केली.

या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक आणि अनेक ग्रामस्थांनी उत्साहाने सहभाग घेतला. तसेच श्रमदानाद्वारे मोलाचे योगदान दिले. त्यांच्या सहकार्यामुळे आणि लोकसहभागातून हा उपक्रम खऱ्या अर्थाने साकार झाला आहे.

### प्रकाशासोबतच सुरक्षिततेची भावना

पूर्वी या गावांमध्ये रात्रीच्यावेळी अंधारामुळे असुरक्षित वातावरण निर्माण होत असे. वनक्षेत्राच्या सान्निध्यात असल्याने वाघ, बिबट्या व इतर वन्य प्राण्यांच्या भीतीमुळे ग्रामस्थांना रात्री हालचाल करणे कठीण जात असे. सौर पथदिव्यांच्या स्थापनेनंतर आता ग्रामस्थ निर्धास्तपणे रात्रीच्या वेळी वावरतात. गावांमध्ये प्रकाशासोबतच सुरक्षिततेची आणि आत्मविश्वासाची भावना निर्माण झाली आहे.

### प्रकल्पतून सामाजिक परिवर्तन

हा प्रकल्प केवळ वीजपुरवठ्याचा नव्हे तर सुरक्षितता, आत्मनिर्भरता आणि शाश्वत विकासाचा किरण ठरला आहे. ग्रामीण भारतात हरित ऊर्जा आणि सामाजिक परिवर्तनाचे हे उज्ज्वल उदाहरण आहे.

## निवडक

### सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन



**सुतारवाडी :** रायगड जिल्हा परिषद पाथरशेत आदिवासीवाडी शाळेत श्री गुरु तेग बहादुर साहेबजी यांच्या ३५० व्या शाहिदी समागम वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट समाजातील धार्मिक ऐक्य वाढवणे, त्याग, समरसतेचा संदेश पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात त्यांच्या जीवनावर आधारीत व्हिडिओ दाखवून संपूर्ण वातावरण भक्तिमय केले. यानंतर गुरु तेग बहादुरांचे त्याग व आदर्शफ या विषयावर सोनावणे यांनी आपले विचार मांडले. याप्रसंगी आदिवासीवाडीचे शिक्षिका स्नेहल सोनावणे, ग्रामस्थ, विद्यार्थी व स्थानिक मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला.

### बाळासाहेब ठाकरे स्मृतिदिन साजरा



**नेरळ :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिन निमित्त नेरळ शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित करून साजरा केला. शहर शाखेच्या वतीने जुन्मापट्टी येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊ वाटप केले. यावेळी तालुका प्रमुख बाजीराव दळवी, पंढरीनाथ राऊत, नेरळ शहर प्रमुख बंडू क्षीरसागर, संतोष सारंग, रोहिदास मोरे, सुमन लोंगले, सुरेश भवरे, अजय कराळे, कुमार बासरे. सखाराम धुळे विलास देशमुख आदी उपस्थित होते.



### पनवेलमध्ये शिवसेना प्रमुखांना वंदन

**पनवेल :** शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त पनवेल शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात शिवसैनिकांनी त्यांच्या अप्रतिमेला वंदन करून मानवंदना दिली. यावेळी महानगर प्रमुख अवचित राऊत, शहरप्रमुख प्रविण जाधव, मा. नगरसेवक अच्युत मनोरे, विभागप्रमुख अमित माळी, उपशहर संघटिका उज्वला गावडे, विभाग संघटिका, अश्विनी देसाई. शाखाप्रमुख शुभम माळी, शाखाप्रमुख बापू जोशी, शाखाप्रमुख प्रदीप माखीचा, शाखाप्रमुख मयुरेश पाटील, राकेश टेमघरे, अरुण ठाकूर, मयुरेश दसवते, सचिन कदम, सचिन रणदिवे आणि शिवसैनिक उपस्थित होते.



### 'महाविकास आघाडीच विजयी होणार'

**पनवेल :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पनवेल तालुक्यात महाविकास आघाडीच विजयी होणार असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी मोर्बे येथे आयोजित पनवेल ग्रामीण विभागातील शिवसेना पदाधिकारी, महिला आघाडी व युवासेना पदाधिकारी यांच्या बैठकीत केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल ग्रामीण विभागातील शिवसेना पदाधिकारी, महिला आघाडी व युवासेना पदाधिकारी यांची बैठकनसहकार द्वारका मोर्बे येथे पार पडली. यावेळी शिवसेना उपनेते बबन पाटील, प्रसाद भोईर, अनिल चव्हाण, भरत पाटील, दिपक घरत, अवचित राऊत, ज्ञानेश्वर बडे, रामदास पाटील, पराग मोहिते, अजय पाटील, मनोज कुंभारकर, शांताराम कुंभारकर, बबन फडके, दत्ता फडके, शशी भगत, विशाल भोईर, धनंजय पाटील, रेवती सकपाळ, सुजाता कदम, अनीता डांगरकर, रेणुका गायकर यांच्यासह शाखा प्रमुख उपशाखा प्रमुख व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री इलेक्ट्रीकल अँड प्लंबिंग वर्क्स, चेंढरे मारुती मंदिराशेजारी कामासाठी ड्रायव्हर, इलेक्ट्रिशन, वायरमन व प्लंबर या कामाचा अनुभव असलेली मुले पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा पगार रु. १५०००/- संपर्क- ९४२२६९०८५३,७८७५६८३७७३
- पाहिजे अलिबागमधील पॅथॉलॉजीकल लॅबमध्ये सकाळी नऊ ते पाच वाजेपर्यंत कामासाठी मदतनीस मावशी पगार आठ हजार संपर्क- ९३७२५४९५३२
- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- अलिबाग एसटी स्टँन्ड जवळ दुकानगाळा अलिबाग समुद्राजवळ फ्लॅट विक्री करणे आहे. विद्यानगरजवळ हॉटेल भाड्याने देणे आहे.९७६४५४८६७९.
- Vacancy for, office staff ,for office in Alibag Attractive salary Call 9923750549

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# महामार्गावर खडीचे साम्राज्य

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील आंबेवाडी बाजारपेठेत मुख्य रस्त्यावर उड्डाण पुलाचे काम सुरु आहे. या रस्त्यावरून जाणारी वाहतूक अनेक दिवसापासून बंद केल्यामुळे ही वाहतूक आंबेवाडी बाजारपेठेपासून विजय वाईन शॉपपर्यंत बायपास रस्त्यानी वळविण्यात आली आहे. या रस्ता ठेकेदाराच्या मनमानीनुसार बनविण्यात आला असल्याचे दिसून येत आहे.

रस्त्याला वापरण्यात आलेली खडी रस्त्यावर पसरलेली आहे. यामुळे ही खडी या रस्त्यावरून वाहन गेल्यावर आजूबाजूने जाणाऱ्या प्रवाशी नागरिकांच्या अंगावर उडत आहे. यामुळे प्रवाश्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

सोमवार (दि.१७) नोव्हेंबर रोजी दुचाकीस्वार या मार्गांवरून प्रवास करीत असतांना बसच्या चाकाखालून एक दगड उडून टुव्हीलरस्वार याच्या डोक्याला लागला. सुदैवाने त्याच्या डोक्याला हेल्मेट असल्यामुळे तो थोडक्यात बचावला.

मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरील चौपदरी करणाच्या रस्त्याचे काम गेली १८ वर्षांपासून सुरु असुन अद्याप ही काम रखडलेल्या अवस्थेत आहे. या महामार्गावरील आंबेवाडी बाजारपेठेतील उड्डाण पुलाचे काम पावसाळा संपल्यानंतर गेली आठ दिवसापासून सुरु करण्यात आला. परंतु हे काम सुरु करण्याच्या अगोदर दोन्ही बाजूच्या बायपास रस्त्याचे काम खड्डे भरून करायला पाहिजे होते. परंतु असे करता संबंधित ठेकेदारांनी या बायपास रस्त्याचे थातुरमातुर काम करून या रस्त्याने वाहतूक वळविण्यात आले आहे. पण या रस्त्याचे काम करतांना वापरण्यात आलेली खडी रस्त्यावरच पसरलेली असुन ही खडी प्रवाशी वर्गाच्या अंगावर उडत आहे, यामुळे एखादा प्रवाशी नाहक जखमी झाला तर याला जबाबदार कोण अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.मुंबई-गोवा हायवेवरील आंबेवाडी बाजारपेठे हे मध्यस्ती ठिकाण असुन येथे मुंबई गोवा, पुणे, अलिबाग या चार ही ठिकाणी जाण्यासाठी प्रवास करायचा असल्यास प्रवाशी वर्गाला आंबेवाडी नाक्यावर यावे लागते. तसेच या मार्गांवर असणारे शाळा,कॉलेज यामुळे विद्यार्थ्यां संख्या ही मोठ्या प्रमाणात येजा करीत असतात.परंतु अशा निस्कृष्ठ दर्जाच्या रस्त्यामुळे प्रवाशी वर्गाला आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.



- **जीव मुठीत घेऊन करावा लागतो प्रवास**
- **ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे नागरिक त्रस्त**

> आंबेवाडी बाजारपेठेतील बायपास रस्त्याचे काम अतिशय निस्कृष्ठ दर्जाचे केले आहे. या रस्त्याला वापरण्यात आलेली खडी रस्त्यावर पसरलेली आहे. या महामार्गाने एखादा मोठा वाहन गेला तर ही पसरलेली खडी प्रवाशी वर्गाच्या अंगावर उडत आहे. याची वारंवार कल्पना संबंधित ठेकेदाराला देण्यात आली आहे, तरी ठेकेदार दुर्लक्ष करीत आहे यामुळे कोण गंभीर जखमी झाला किंवा कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार संबंधित ठेकेदार असेल. -चंद्रकांत लोखंडे.

## जिल्हास्तरीय विज्ञान मॉडेल स्पर्धेत पीएनपीचा प्रथम क्रमांक



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी वेश्वी अलिबाग, होली चाईल्ड सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सवातील विज्ञान मॉडेल बनविण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून शाळेचा बहुमान उंचावला आहे.

या स्पर्धेत शाळेचे विद्यार्थी मनस्व थळे, स्निग्धा पाटील आणि सर्वेश साताळकर यांनी सहभाग घेतला होता, त्यांच्या अभिनव कल्पना, उत्तम सादरीकरण आणि कष्टाने त्यांना हे यश प्राप्त झाले. ही स्पर्धा जेएसएम महाविद्यालयात, भारत सरकारच्या युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती.

या यशाबद्दल विद्यार्थ्यांना पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांचे अमूल्य प्रोत्साहन लाभले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लैयम्माल, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## 'आगरी शाला' उपक्रमाचे आयोजन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका आगरी समाज संघटना आणि आगरी साहित्य चळवळ यांच्या विद्यमाने आगरी बोली भाषा यांच्यावर आधारित आगरी शाला कार्यशाळा आयोजित केली आहे. (दि.२३) नोव्हेंबर रोजी ही कार्यशाळा नेरळ येथील आगरी समाज हॉल नेरळ येथे होणार आहे. या एकदिवसीय कार्यशाळेत 'आगरी शाला' पुस्तकाचे प्रकाशन आणि आगरी ग्रंथालय उद्घाटन केले जाणार आहे. या एकदिवसीय कार्यशाळेत आगरी भाषेतील प्रवचन, आगरी कथा अभिवाचन, शब यांची आगरी शाला परीक्षा, आगरी बोलीमधील गंमती जमती, कवींचे काव्य संमेलन, धवला कार्यशाला, आगरी गीतांचा प्रवास याचे आयोजन करण्यात येणार आहे.




या सोहळ्यात आगरी कला गौरव पुरस्कार मनोहर कोळंबे, आगरी भाषेत 'पीएचडी' करणारे पनवेल येथील डॉ. अविनाश पाटील यांना आगरी साहित्य गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे अशी माहिती आगरी साहित्यिक सर्वेश तरे आणि कर्जत तालुका आगरी समाज संघटना अध्यक्ष संतोष पेरणे यांनी दिली आहे. अलिबाग अर्बन बँकेचे अध्यक्ष अनिल जोशी व रेश्मा जोशी यांचे हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. या सोहळ्यास सावळाराम जाधव, एकनाथ धुळे, सुरेश टोकरे, वसंत कोळंबे, महेश विरले, सर्वेश तरे, मोरेश्वर पाटील, दया नाईक संगीतकार हे उपस्थित राहणार आहेत.

## नितीन राजपूरकर सेवानिवृत्त

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड-कुंभारवाडा येथील रहिवासी अलिबागच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ लिपिक नितीन राजपूरकर हे आपली ३३ वर्षांची सेवा उत्तम प्रकारे पुर्ण करुन सेवानिवृत्त झाले. त्यांचा सार्वजनिक बांधकाम विभाग व कुंभार समाज, सत्यम युवक मंडळ, ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.




अलिबाग येथे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात कार्यकारी अभियंता एम. एम. धायतडक यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत राजपूरकर व कुटुंबियांचा सत्कार करुन पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच कुंभार समाज, सत्यम युवक मंडळ, ग्रामस्थांच्या वतीने सेवानिवृत्ती निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी जयवंत अंबाजी, एम. एम. धायतडक, अजित सांगळे, यू. एस. राठोड, नारायण बिरवाडकर, संदीप राजूरकर, दत्तात्रेय राजपूरकर, डॉ. विश्वास चव्हाण, दिपेश राजपूरकर, सुमीत दर्गे, अनंता म्हसाळकर, अरुण म्हसाळकर, अवधूत चव्हाण, प्रसाद चव्हाण, समाज बांधव व ग्रामस्थ उपस्थित होते.

## सुशांत देशमुख यांचे निधन

**धाटाव :** रोहा तालुक्यातील वरसे येथील सुशांत देशमुख यांचे निवास स्थानी निधन झाले. कर्जत तालुक्यातील मूळ शिरसे गावातील सुशांत मोतीराम देशमुख हे कामानिमित्त रोहा (वरसे) येथे वास्तव्यास आले.



त्यांचे निधना समयी वय ४४ वर्षे होते. त्यांच्यावर वरसे वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी गुरुवार (दि. २०) नोव्हें तर उत्तरकार्य शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी वरसे येथे निवासस्थानी करण्यात येणार आहेत.

## राखीव वन क्षेत्रातील जागेवर चुकीने बदल

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्याजवळील पिगोंडे ग्रामपंचायत हद्दीतील वेलशेत गावच्या हद्दीतील गट क्रमांक २२२ राखीव वन क्षेत्रातील जागेवर एमआयडीसीकडून चुकीने बदल करून सुरू केलेले काम तत्काळ थांबविण्याची मागणी वेलशेत येथील प्रल्हाद पारंगे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. या राखीव वन क्षेत्रातील जागेच्या ७/१२ उताऱ्यामध्ये चुकीने खासगी नाव नोंद झाल्याने या बदलाची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी पारंगे यांनी उप वनसंरक्षक, अलिबाग यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

यासंदर्भात पारंगे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मौजे वेलशेत, पो. पिगोंडे, ता. रोहा येथील गट क्रमांक २२२ मधील जमीन ही शासनाने भारतीय वन अधिनियम, १९२७ नुसार राखीव वन क्षेत्र म्हणून घोषित केली आहे. मात्र या जमिनीचा ७/१२ उतारा हा एमआयडीसीच्या नावावर चुकीने बदल करण्यात आला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच संबंधित ठिकाणी औद्योगिक विकासाचे कामकाज सुरू करण्यात आले आहे. ही बाब शासनाच्या वन जमिनीच्या मालकी हक्कास बाधक असून या प्रकारामुळे वन संरक्षक अधिनियम, १९८० तसेच महाराष्ट्र वन अधिनियम, १९६१ चे यामुळे उल्लंघन होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे संबंधित ठिकाणी सुरू असलेले एमआयडी सीचे काम तात्काळ थांबविण्याचे आदेश व्हावेत, चुकीचा ७/१२ रद्द करून राज्य शासन वन विभाग अशी नोंद पुन:स्थापित करण्यात यावी तसेच या जागे संबंधी चुकीचा बदल कोणी केला याची चौकशी करून संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात वन विभागाचे नागोठणे वन परिक्षेत्र अधिकारी दादासाहेब कुकडे यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.



● मुरुड शहरात सकाळी सुर्योदयाच्या वेळी सोनेरी किरणात नागरिक चालण्याचा आनंद घेताना.
(छायाचित्र : सुधीर नाझरे)

## जनजाती गौरव दिन साजरा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

आदिवासी मुलीचे शासकीय वस्तीगृह येथे भगवान बिरसा मुंडा यांचे १५० वी जयंती साजरी करण्यात आली.यावेळी जयंतीनिमित्त नेरळ परिसरात प्रभाग फेरी काढण्यात आली होती.

जनजाती गौरव दिन पंधरवाडा अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा सहभागी विद्यार्थ्यांना सन्मानवर घेत असतो देऊन गौरवण्यात आले. या कालावधीत भगवान केसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त गौरव कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२४/२५ मधील वस्तीगृहातील दहावीचा व बारावी विशेष गुणांसह उत्तीर्ण विद्यार्थीनीचा गुणगौरव कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आदिवासी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यक्रम करणाऱ्या व्यक्ती संस्था यांचा सन्मान आदिवासी क्रांतिकारकांचा परिचय व त्यांचे कार्याबाबत प्रदर्शन भरवण्यात आले होते. यावेळी आदिवासी संस्कृतीवर आधारित कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते.

## रायगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम

**। उरण । प्रतिनिधी ।**

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार व कार्य, आदर्श डोळ्यासमोर ठेऊन श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचार व कार्याचा प्रचार व प्रसार करणाऱ्या शिव मावळे करंजाडे यांच्या वतीने स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर्ती माझा किल्ला माझी जबाबदारी ही संकल्पना मोठ्या उत्साहात संपन्न झाली. मोहिमेमध्ये सुनील अंबावडे, राकेश कुसळे, अविनाश ठोसर, प्रशांत शेट्टी, अमर कुसळे, शंतनू कदम, रोहन शिर्के, सुरेश बार्वे,सतिश चालगे, दिनेश टीमगिरे, समीर कांबळे, अमर सावंत, विवेक शिंदे, सिद्धांत अंबावडे, ओंकार, आनंद पुजारी, अथर्व, सत्यजित पाटील आदी मान्यवरांनी स्वच्छता मोहिमेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. यावेळी प्रत्येकाने 'माझा किल्ला माझी जबाबदारी' ही संकल्पना राबवावी असे आवाहन करण्यात आले.

**वर्दळ कमी असल्याने जिवीतहानी टळली | दोन अग्निशमन गाड्यांच्या मदतीने नियंत्रण**

# मानसरोवरजवळ कचऱ्याला आग

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मानसरोवर रेल्वे स्थानका जवळील मोकळ्या मैदानात टाकलेल्या पालिकेच्या कचऱ्याला अचानक भीषण आग लागली, आणि काही क्षणांतच काळ्या धुराचे प्रचंड लोट संपूर्ण परिसरात पसरले. अचानक उठलेल्या या धुरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हि जागा अनेक दिवसांपासून पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष विभाग आणि घंटागाडी कर्मचाऱ्यांनी टाकलेल्या कचऱ्याने भरलेली होती.

परिसरातील नागरिकांनी याबाबत अनेकदा तक्रारीही केल्या होत्या. मात्र तो कचरा हटवला गेला नव्हता. मंगळवार (दि.१८) नोव्हेंबर रोजी सकाळी अचानक लागलेल्या आगीमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली.



काही मिनिटांतच पनवेल महानगरपालिकेच्या दोन अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले, पण कचरा, सुक्या फांद्या आणि झुडुपांमुळे ज्वाळांनी काही क्षणांतच उग्र रूप धारण केले होते. जवळपास तासाभराच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आली. या आगीत झाडांचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने आसपास कोणतीही घरे नसल्याने आणि लोकांची वर्दळ कमी असल्याने जीवितहानी टळली आहे.

मोकळ्या मैदानात नियमितपणे कचरा, वृक्षछाटणीचा माल आणि सुक्या फांद्या टाकल्या जातात, असे कचऱ्याचे ढिग साचल्यामुळे अशा दुर्घटना घडत आहेत. जबाबदार कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली पाहिजे.

घटनेनंतर अग्निशमन दलाने परिसरातील कचरा, झुडपे व ज्वलनशील साहित्य तातडीने हटवण्याची सूचना दिली. तसेच भविष्यात अशी घटना टाळण्यासाठी या जागेवर पहारा ठेवण्याचा सल्लाही दिला आहे. कामोठ्यात वारंवार घडणाऱ्या अशा घटना लक्षात घेता, पालिकेच्या कचरा व्यवस्थापनावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शहरात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वृक्षछाटणी आणि कचरा संकलनामुळे ही समस्या वाढत चालली आहे. नागरिकांनी यावर योग्य ती कारवाई व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

> **नागरिकांची नाराजी व्यक्त**
> पालिकेचे कर्मचारी मोकळ्या जागेत कचरा टाकतात, त्यामुळे परिसरात घाण पसरतेच, पण आगीसारख्या धोकादायक परिस्थितीला सामोरे जावे लागते. आजची आग हे त्याचेच उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रशांत देशमुख

**पनवेल** : अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद आयोजित १८ वे राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन खानवडी ता. पुरंदर येथे (दि.२७) नोव्हेंबर रोजी होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील हातनोली येथील प्रशांत देशमुख यांची तर स्वागताध्यक्ष पदी गौरव कोलते यांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती संमेलनांचे मुख्य संयोजक व ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली. संमेलनात कथाकथन, ग्रंथदिंडी, नाट्यप्रयोग, कविसंमेलन असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. संमेलनास सूरज चव्हाण, आ. विजय शिवतारे, माजी आ. संजय जगताप, विजय कोलते, डॉ दिगंबर दुर्गाडे, बाबाराजे जाधवराव, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जयप्रकाश घुमटकर आदी उपस्थित राहणार आहेत.

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**
**अर्ज क्र.५६१/२०२५**

आबिदाबी अली सो.बडे
रा.मोर्बा. ता. माणगाव — अर्जदार
जि. रायगड
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.आबिदाबी अली सो.बडे यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.१५-६-१९४८ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. ७-१०-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि. १५-६-१९४८ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि. .... रोजी मोर्बा ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव — **(दशरथ काळे)**
**दिनांक :- १३-११-२०२५** — **कार्यकारी दंडाधिकारी, माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**
**अर्ज क्र.५६७/२०२५**

झीनत बेगम हुसैन बडे
रा.मोर्बा. ता. माणगाव — अर्जदार
जि. रायगड
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. झीनत बेगम हुसैन बडे यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा ता. माणगाव, जि. रायगड याठिकाणी दि.१०-१०-१९६७ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. १-१०-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि. १०-१०-१९६७ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि. .... रोजी मोर्बा ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव — **(दशरथ काळे)**
**दिनांक :- १३-११-२०२५** — **कार्यकारी दंडाधिकारी, माणगाव, जि.रायगड**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**काँग्रेस भवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता. अलिबाग, जि. रायगड पिन कोड ४०२२०१**
Email ID : aresalibag@gmail.com

जा.क्र.सनिअ/वि.१/का.क.१०१/कुलाबा ना.स.प./सुनावणी नोटीस/६६३/२०२५ दिनांक : १८/११/२०२५

## जाहीर नोटीस
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अलिबाग जि. रायगड यांचेसमोर**
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये अर्ज.**
अर्ज क्रमांक :- १६०/२०२५

कुलाबा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग
तर्फे व्यवस्थापक श्री. समीर सुरेश काठे ... अर्जदार
विरूद्ध
१. श्री. संतोष दौलत गिरी
मु. वाघोली, पो. कामार्ले, ता. अलिबाग
२. श्री. अरविंद दौलत गिरी
मु. बिरवाडी, पो. कामार्ले, ता. अलिबाग
३. श्री. लालचंद गंगाधर पाटील
मु. विजडीपी, कुरकुंडी, पेझारी, ता. अलिबाग

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमचे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रू. ९,९०,८१५/- साठीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधून कळविण्यात येते की, कुलाबा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग तर्फे व्यवस्थापक श्री. समीर सुरेश काठे यांनी प्रतिवादी यांचेविरूद्ध दिनांक १३/१०/२०२५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरून अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादींना नोटीस दिनांक १३/१०/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना बजाविली गेली नाही. तसेच दि. १८/११/२०२५ रोजी सुनावणीस जाब देणार १ ते ३ गैरहजर राहिल्याने आपणास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, दिनांक ०२/१२/२०२५ रोजी दिवसाचे दुपारी १२.०० वा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, काँग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता. अलिबाग, जि. रायगड पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे. याकामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करून, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : १८/११/२०२५ — सही/-
**(अनिल पवार)**
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था अलिबाग

## जाहीर नोटीस
सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत ही या खाली दिलेल्या जमीन मालक यांच्या नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नावे असुन त्यांचे खुद्द ताबा कब्जा मालकी वहीवाटीतील आहेत. त्या शेतजमीनी मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे भातसई, ता. रोहा, जि. रायगड येथील .......**

| मालकांचे नाव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| वैशाली भाऊ केंडे | ४०३ | वरकस ०२-३४-००<br>पो.ख. ००-५५.००<br>एकुण ०२-८९-०० | २.०० | खालसा |

वरील मिळकती संबधांत आमचे अशील यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लीज, फरोक्त, साठे करार, अखत्यार, लिन चार्ज, अ‍ॅटॅचमेंन्ट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचन चिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून (१४) चौदा दिवसात लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही हे काळावे.

दि. १९/११/२०२५ — सही/-
**अ‍ॅड. पी.जी.दाभाडे**
रा.फ्लॅट नं.४०२, बी विंग, ४ था मजला
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर
डॉ.वागळे हॉस्पिटल जवळ, ता.रोहा,
जि. रायगड पिन ४०२१०९
मो. नं. ९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**
**अर्ज क्र.५६४/२०२५**

कौसरी आयुब गंग्रेकर
रा.मोर्बा. ता. माणगाव — अर्जदार
जि. रायगड
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. कौसरी आयुब गंग्रेकर यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा ता. माणगाव, जि. रायगड याठिकाणी दि.२-४-१९७६ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. ७-१०-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि. २-४-१९७६ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि. .... रोजी मोर्बा ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव — **(दशरथ काळे)**
**दिनांक :- १३-११-२०२५** — **कार्यकारी दंडाधिकारी, माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**
**अर्ज क्र.५६५/२०२५**

फरजाना अहमद राऊत
रा.मोर्बा. ता. माणगाव — अर्जदार
जि. रायगड
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.फरजाना अहमद राऊत यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.१-६-१९७७ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. १-८-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि. १-६-१९७७ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि. .... रोजी मोर्बा ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव — **(दशरथ काळे)**
**दिनांक :- १३-११-२०२५** — **कार्यकारी दंडाधिकारी, माणगाव, जि.रायगड**

## ग्रुप ग्रामपंचायत चरी
मु.चरी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड, पि.को.नं. ४०२१०८

जा.क्र.५३२ — दिनांक :- १८-११-२०२५

**जाहीर नोटीस**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व कर फी शुल्क १९६० नुसार खालील मालमत्तेच्या नावे संबंधाने ग्रुप ग्रामपंचायत चरीकडे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या परत्वे १६ अ मधील नियमाप्रमाणे सदर संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रुप ग्रामपंचायत चरीकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | घर क्र. | असेसमेंट दप्तरी असलेल्या घर मालकाचे नाव | नवीन नोंद करावयाचे घर मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | घर क्र.५२ | भार्गव काशिनाथ थळे | श्रीम. सिमा वासुदेव पाटील,<br>श्रीम.साधना बाळाराम पाटील,<br>श्री. प्रशांत बाळाराम पाटील,<br>श्री. प्रसाद बाळाराम पाटील, |

**सही/-**
**श्री. गणेश पोशा म्हात्रे**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत चरी**

**सही/-**
**ग्रुप ग्रामपंचायत चरी**
**ता.अलिबाग, जि. रायगड**

## जाहिरात
शासन निर्णय क्र. महसूल व वन विभाग एस-१०/२०२४/प्र. क्र. १२७, दि. ०२/०८/२०२४ अन्वये कांदळवन कक्ष मुंबई पुनर्रचना होऊन (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हा) कांदळवन विभाग, दक्षिण कोकण विभागाची स्थापना करण्यात आली आहे. विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग, दक्षिण कोकण यांचे कार्यालयाचे मुख्यालय अलिबाग-रायगड येथे आदेशित केले असून अलिबाग येथे स्थित आहे. विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग, दक्षिण कोकण विभागांतर्गत वनपरिक्षेत्र रायगड, रत्नागिरी, मालवण (सिंधुदुर्ग) कांदळवन हे समाविष्ट आहेत.

विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग, दक्षिण कोकण कार्यालयात वन विभागातून सेवानिवृत्त झालेल्या अनुभवी वन सर्वेक्षक/वनक्षेत्र सर्वेक्षकाची आवश्यकता आहे. तरी इच्छुक सेवानिवृत्त वन सर्वेक्षक/वनक्षेत्र सर्वेक्षक यांनी सदर जाहिरात प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत त्यांचे अर्ज विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग, दक्षिण कोकण, स्वप्नपूर्ती बंगला, होरायझन हॉलच्या मागे, मु. लक्ष्मीनगर, पो. वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ या कार्यालयात लेखी स्वरूपात समक्ष येवून सादर करावेत. त्यानंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

ठिकाण :- अलिबाग — सही/-
दिनांक :- १८/११/२०२५ — **(कांचन पवार)**
**विभागीय वन अधिकारी,**
**कांदळवन विभाग, दक्षिण कोकण.**

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**
**अर्ज क्र.५६३/२०२५**

मुश्ताक ईब्राहीम राऊत
रा.मोर्बा. ता. माणगाव — अर्जदार
जि. रायगड
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.मुश्ताक ईब्राहीम राऊत यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.१३-६-१९७६ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. ७-१०-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू येथे दि. १३-६-१९७६ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि. .... रोजी मोर्बा ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव — **(दशरथ काळे)**
**दिनांक :- १३-११-२०२५** — **कार्यकारी दंडाधिकारी, माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**
अर्ज क्र.५६२/२०२५

साबीरा कमरूद्दीन फिरफिरे
रा. मोर्बा, ता. माणगाव — अर्जदार
जि रायगड
**विरुद्ध**
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.साबीरा कमरूद्दीन फिरफिरे यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा ता. माणगांव, जि. रायगड या ठिकाणी दि.१७/५/१९५६ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१/१०/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि.१७/५/१९५६ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. रोजी मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल

ठिकाण : माणगाव — **(दशरथ काळे)**
दिनांक : १३/११/२०२५ — कार्यकारी दंडाधिकारी, माणगाव, जि. रायगड

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**
अर्ज क्र.५६९/२०२५

हुसैनमिया इस्माईल राऊत
रा. मोर्बा, ता. माणगाव — अर्जदार
जि रायगड
**विरुद्ध**
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.हुसैनमिया इस्माईल राऊत यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा ता. माणगांव, जि. रायगड या ठिकाणी दि.२२/०९/१९७७ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.७/१०/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि. २२/०९/१९७७ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. रोजी मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल

ठिकाण : माणगाव — **(दशरथ काळे)**
दिनांक : १३/११/२०२५ — कार्यकारी दंडाधिकारी, माणगाव, जि. रायगड

## जाहिर नोटिस
तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी मौजे कार्ले ता. अलिबाग येथील गट नंबर-२१५/१ एकुण क्षेत्र-०.३९.१० (हे.आर) (आकार-०.५३-रु.पैसे) हि भातशेती मिळकत महसूल दप्तरी म्हणजेच सात बाराचे दप्तरी मालक म्हणून श्री. संतोष पांडुरंग मानकर यांचे नावे दाखल आहे. सदर मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी ०-२०-०० (हे. आर) इतके क्षेत्र माझे अशिलांनी मिळकतीचे मालक श्री. संतोष पांडुरंग मानकर यांच्याकडून रजिस्टर्ड खरेदीखताच्या दस्ताऐवजाने घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबाकब्जा श्री. संतोष पांडुरंग मानकर यांचाच आहे असा भरवसा श्री. संतोष पांडुरंग मानकर यांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र हे आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कार्ले ता.अलिबाग | २१५/१ | एकूण क्षेत्र- ०.३९.९० (हे.आर) | ०-५३ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी श्री. संतोष पांडुरंग मानकर यांचे मालकीचे क्षेत्र ०.३९.१० (हे. आर) मिळकतीपैकी क्षेत्र ०-२०-०० हे. आर क्षेत्र या जाहिर नोटिसीचा विषय आहे.

सदर मिळकतीची मालकी व ताबाकब्जा पूर्णपणे निर्वेध व मार्केटेबल आहे असा भरवसा श्री. संतोष पांडुरंग मानकर यांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. सबब वरील मिळकतीची मालकी व ताबाकब्जा श्री. संतोष पांडुरंग मानकर यांचाच आहे असे गृहीत धरून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत. तरी या मिळकतीचे संदर्भात कोणाचीही, गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, साठेकरार, वहीवाटीचा किंवा तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांना प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदारतर्फे ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत समक्ष हजर राहून हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचाही कसलीही हरकत न आल्यास मिळकतींच्या मालकी व ताबाकब्जा, विद्यमान कब्जेदार श्री. संतोष पांडुरंग मानकर यांचाच आहे असे गृहीत धरून खरेदीखत रजिस्टर्ड करून खरेदीचा व्यवहार माझे अशिल पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग — सही/-
ता. १७/११/२०२५ — **(श्री. विश्वनाथ धर्मा भगत)** B.A.LLB
(ॲडव्होकेट अलिबाग)
पत्ता:-आकार अपार्टमेन्ट,
जाधव नगर चेंढरे, अलिबाग
मो.नं.-८९७५९३५८०१

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**
अर्ज क्र.५६६/२०२५

शौकत अली उमर फिरफिरे
रा. मोर्बा, ता. माणगाव — अर्जदार
जि रायगड
**विरुद्ध**
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.शौकत अली उमर फिरफिरे यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा ता. माणगांव, जि. रायगड या ठिकाणी दि.२९/०१/१९५९ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.७/१०/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि. २९/०१/१९५९ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. रोजी मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल

ठिकाण : माणगाव — **(दशरथ काळे)**
दिनांक : १३/११/२०२५ — कार्यकारी दंडाधिकारी, माणगाव, जि. रायगड

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**
अर्ज क्र.५६८/२०२५

मोहम्मद अमीन इस्माईल लोखंडे
रा. मोर्बा, ता. माणगाव — अर्जदार
जि रायगड
**विरुद्ध**
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.मोहम्मद अमीन इस्माईल लोखंडे यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा ता. माणगांव, जि. रायगड या ठिकाणी दि.३१/०१/१९६५ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१/१०/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि.३१/०१/१९६५ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. रोजी मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल

ठिकाण : माणगाव — **(दशरथ काळे)**
दिनांक : १३/११/२०२५ — कार्यकारी दंडाधिकारी, माणगाव, जि. रायगड

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**
अर्ज क्र.५७०/२०२५

सईदा बेगम हुसैन बडे
रा. मोर्बा, ता. माणगाव — अर्जदार
जि रायगड
**विरुद्ध**
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मोर्बा, ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.सईदा बेगम हुसेन बडे यांचा जन्म/मृत्यू मौजे मोर्बा ता. माणगांव, जि. रायगड या ठिकाणी दि.१०/९/१९७५ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१/१०/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू मोर्बा येथे दि.१०/९/१९७५ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. रोजी मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल

ठिकाण : माणगाव — **(दशरथ काळे)**
दिनांक : १३/११/२०२५ — कार्यकारी दंडाधिकारी, माणगाव, जि. रायगड

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



### ‘कसोटी क्रिकेटला श्रद्धांजली’

**नवी दिल्ली** : त्यांनी कसोटी क्रिकेट पूर्णपणे उद्ध्वस्त केले. कसोटी क्रिकेटला श्रद्धांजली, अशा तीव्र शब्दात भारताचा माजी क्रिकेटपटू हरभजनसिंगने ईडन गार्डनवरील खेळपट्टी तयार करणाऱ्यांवर आसूड ओढले आहेत. कसोटी क्रिकेटला अत्यंत मारक अशी ईडन गार्डनची खेळपट्टी होती. पूर्ण तयार केलेली खेळपट्टी नव्हती आणि केवळ गोलंदाजांसाठीच ती तयार करण्यात आली होती, अशी नाराजी हरभजने व्यक्त केली आहे. ईडन गार्डनवर झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताचा ३० धावांनी पराभव केला. दुसऱ्या डावात १२४ धावांचे आव्हान पार करता आले नाही. पाच दिवसांचा हा सामना अडीच दिवसांतच संपला. त्यामुळे खेळपट्टीवर चौहोबाजूंनी टीका होत आहे. हरभजन सिंग यांनी तर चाबूक ओढले. कसोटी क्रिकेटच्या प्रगतीसाठी हे मारक असल्याचेही हरभजन म्हणाला.



### मुंबईची दणक्यात सुरुवात

**मुंबई** : सहाशे धावांचा डोंगर उभा केल्यानंतर मुंबईने पुदुचेरीची ४ बाद ४३ अशी अवस्था केली आणि वानखेडे स्टेडियमवर सुरू असलेल्या रणजी क्रिकेट सामन्यावर असलेली पकड अधिक घट्ट केली. मुंबईकडून यंदाच्या मोसमात फॉर्मात असलेल्या सिद्धेश लाडने चार सामन्यांतले आपले तिसरे शानदार शतक (१७०) केले. यष्टिरक्षक आकाश आनंदनेही शतकी (१०७) खेळी केली. सर्फराझ खानही फॉर्मात आला असून त्यानेही ६७ धावा फटकावल्या. त्यामुळे मुंबईने पहिल्या डावात पाच बाद ६३० धावा केल्या. फॉलोऑन वाचवण्यासाठी पुदुचेरीला ४३१ धावा करणे गरजेचे आहे; परंतु, दुसऱ्या दिवसअखेर त्यांची ४ बाद ४३ अशी अवस्था करून मुंबईने निर्णायक विजयासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. आयुष म्हात्रेचा अपवाद वगळता मुंबईच्या सर्व फलंदाजांनी ठसा उमटवला. अखिल हेरवाडकर आणि मुशीर खान यांनी गाजवला होता. दोघांनाही शतकाची संधी होती.

### आयर्नमॅन अजय दडस यांचे यश

**बिजवडी** : गोवा येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय आयर्नमॅन या स्पर्धेत पांगरी येथील अजय दडस यांनी यश संपादन केले आहे. शारीरिक क्षमतेची आणि मानसिक संयमाची परीक्षा घेणाऱ्या आयर्नमॅन या स्पर्धेत ३३ देशांतील सुमारे १३०० खेळाडू सहभागी झाले होते. दडस हे सध्या वडोदरा (गुजरात) विमानतळ येथे असिस्टंट या पदावर कार्यरत आहेत. ही नोकरी सांभाळत त्यांनी फिटनेससाठी वेळ काढत स्पर्धा पूर्ण केली. गोवा येथे पार पडलेल्या या स्पर्धेत १.९ किमी समुद्रात पोहणे, ९० किमी सायकलिंग आणि २१.१ किमी धावणे या तिहेरी आव्हानात्मक टप्प्यात त्यांनी आपली क्षमता आणि दृढनिश्चय सिद्ध केला. ही स्पर्धा ७.४८ मिनिटांमध्ये पूर्ण करत आपल्या पहिल्याच प्रयत्नात आयर्नमॅन हा किताब पटकावला. भारतीय विमानपतन प्राधिकरणमधील देशातील पहिलाच खेळाडू होण्याचा बहुमान देखील त्यांनी प्राप्त केला.



# कूच बिहारी चषकात महाराष्ट्राचा बोलबाला

- नागोठण्याच्या रिलायन्स स्टेडियमवर सामन्यांचे आयोजन
- जक्षन सिंह, सुवाशिक जगतापने झळकावले शतक

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील नागोठणे येथील रिलायन्स स्टेडियमच्या मैदानावर कूच बिहारी चषकाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा या सामन्याला रंगत आली आहे. पहिल्या दोन दिवसांच्या खेळाच्या समाप्ती नंतर महाराष्ट्राच्या युवा खेळाडूंनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत सामन्यावर आपली पकड बनवली आहे. तसेच, महाराष्ट्राचा सलामीवीर फलंदाज जक्षन सिंह याने पहिल्या दिवशी १०२ धावा ठोकत आपले शतक पूर्ण केले. तर, दुसऱ्या दिवशी अष्टपैलू खेळाडू सुवाशिक जगताप याने ११७ धावा ठोकल्या.





नागोठण्यातील रिलायन्स मैदानात महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा कूच बिहार ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेतील सामन्याला रंगत आली आहे. पहिल्या दोन दिवसांच्या खेळाच्या समाप्ती नंतर महाराष्ट्राच्या युवा खेळाडूंनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत सामन्यावर आपली पकड बनवली आहे. महाराष्ट्राचा तंत्रशुद्ध सलामीवीर फलंदाज जक्षन सिंह याने सामन्याच्या पहिल्या दिवशी धुवांधार फलंदाजी करत १३ चौकार व एका षटकाराच्या सहायाने १०२ धावा ठोकत आपले शतक पूर्ण केले. दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राचा मधल्या फळीतील अष्टपैलू खेळाडू सुवाशिक जगताप याने मैदानाच्या चौफेरी टोलेबाजी करत ११७ धावा काढल्या. त्यामध्ये १३ चौकार व एका षटकारांचा समावेश होता. महाराष्ट्राने दुसऱ्या दिवशी सर्व गडी गमावत १४९.३ षटकांमध्ये ५२८ धावांचा डोंगर उभा केला. ओडिशाकडून अर्पित मोहंती याने सर्वाधिक ५ तर राझ यादव व रुद्र मलिक यांनी प्रत्येकी २ फलंदाजांना बाद केले.

त्यानंतर लक्षाचा पाठलाग करताना ओडिशा संघाने सावध सुरुवात करत दिवसाअखेर ३ गडी गमावत १३४ धावा फलकावर नोंदवल्या आहेत. त्यामध्ये स्वागत मिश्रा याने ४२ व बिश्वजीत प्रधान नाबाद २८ धावांवर खेळत आहे. महाराष्ट्राच्या संघाकडून अर्कम सय्यद व अभिनंदन अडक यांनी प्रत्येकी एक फलंदाज बाद केला. महाराष्ट्राच्या संघाचे मुख्य प्रशिक्षक इंद्रजीत कामतेकर व संघ व्यवस्थापक राहुल अरवाडे यांनी खेळाडूंच्या कामगिरीवर समाधान व्यक्त केले आहे.

हा सामना पाहण्यासाठी महाराष्ट्राच्या संघाचे माजी क्रिकेटपटू व मुख्य सिलेक्टर श्रीकांत काटे व निवड समितीचे सदस्य शिरीष काम थे उपस्थित होते. त्यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी सांगितले की, रिलायन्स नागोठणेचे मैदान अतिशय सुरेख आहे. तसेच, येथील खेळपट्टी फलंदाजी व गोलंदाजी दोन्ही साठी अनुकूल असणार आहे. रायगड जिल्ह्यात मुसळधार पासून पडून सुध्दा अतिशय कमी वेळात मैदान तयार केले. रिलायन्स हॉर्टिकल्चर विभागाचे प्रमुख शरद पवार मैदानाचे कंत्राटदार संतोष कोठे,ग्राऊंड्समन कुमार पिंगळस्कर व संदेश पाटील यांनी अतिशय मेहनत करून सुरेख खेळपट्टी तयार केली आहे. खेळपट्टीवर फलंदाजांनी संयम व तंत्रशुद्ध पद्धतीने फलंदाजी केल्यास मोठी धावसंख्या केली जाऊ शकते. तसेच, गोलंदाजांना सुध्दा खेळपट्टी साथ देणारी ठरेल. कूच बिहार ट्रॉफी सामन्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन व रिलायन्स नागोठाणे विभागाचे त्यांनी आभार मानले आहेत. येणाऱ्या क्रिकेट हंगामात बीसीसीआय तसेच महाराष्ट्राच्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धा याच मैदानावर घ्याव्यात, अशी मागणी एमसीएकडे करणार असल्याचे देखील श्रीकांत काटे यांनी सांगितले.

## सौरव गांगुलीचे ‘गंभीर’ खडेबोल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि दक्षिण आफ्रिका संघात कसोटी मालिका सध्या सुरू आहे. या सामन्यात कोलकातामध्ये झालेल्या पहिल्या सामन्यात भारताला ३० धावांनी पराभवाचा धक्का बसला. खेळपट्टीवर गोलंदाजांना चांगली मदत मिळाली होती, विशेषतः फिरकी गोलंदाजांना. त्यामुळे हा सामना तीनच दिवसात संपला. त्यामुळे खेळपट्टीबद्दल बरीच चर्चा झाली. सामन्यानंतर भारताचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने मात्र खेळपट्टीची पाठराखण केली होती. आता याबाबत माजी क्रिकेटपटू आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली यांनी स्पष्ट शब्दात गंभीरला सुनावले आहे. गांगुली यांनी सांगितले की, मला गौतम अत्यंत प्रिय आहे. त्याने २०११ आणि टी-२० विश्वचषकात नक्कीच चांगली कामगिरी केली आहे. तो यापुढेही चांगली कामगिरी करेल. परंतु, त्याने भारतात चांगल्या खेळपट्टीवर खेळावे. त्याने बुमराह, शमी आणि सिराज यांच्यावर विश्वास ठेवायला पाहिजे. मला वाटतं शमी भारताच्या संघात निवड होण्यासाठी पात्र आहे. तो कसोटी सामने जिंकवून देऊ शकतो. त्याने रणजी ट्रॉफी स्पर्धेत चांगली कामगिरी केली आहे. त्याने नुकत्याच खेळलेल्या ४ सामन्यांत १७ बळी घेतले आहेत, असे गांगुलीने म्हटले आहे.

## सात्विक-चिराग जोडीवर भारताची मदार



**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

यंदाच्या आंतरराष्ट्रीय मोसमामध्ये भारतीय खेळाडूंना एकेरी विभागामध्ये जेतेपदापासून सातत्याने दूर राहावे लागत आहे. त्यामुळे मंगळवारपासून सुरू होत असलेल्या ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये भारताची मदार पुन्हा एकदा सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीवर असणार आहे. या जोडीला यंदाच्या मोसमातील पहिल्यावहिल्या जेतेपदाची आस असणार आहे.

सात्त्विक-चिराग या जोडीने जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेमध्ये कांस्यपदक पटकावले. हाँगकाँग व चायना मास्टर्स या दोन स्पर्धांमध्ये उपविजेतेपदापर्यंत मजल मारली. अठरा आठवडे ही जोडी पहिल्या स्थानावर विराजमान होती. मे महिन्यात या जोडीची २७व्या स्थानावर घसरण झाली; मात्र, आता पुन्हा तिसऱ्या स्थानावर मुसंडी मारण्यात या जोडीला मिळाले आहे. ऑस्ट्रेलियन ओपन या स्पर्धेमध्ये भारतीय जोडीसमोर सलामीच्या लढतीत चँग को ची-पो ली वेई या चीन तैपईच्या खेळाडूंचे आव्हान असणार आहे.

## नेणवली कबड्डी स्पर्धेत रासळ विजयी





- उदलाई माता क्रीडा मंडळाच्यावतीने उत्कृष्ट नियोजन

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

श्री उदलाई माता क्रीडा मंडळ नेणवली यांच्यावतीने आणि सुधागड तालुका स्पोर्ट्स असो. च्या मान्यतेने तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि.१६) रोजी नेणवली येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत तालुक्यातील नामवंत संघानी आपला प्रवेश नोंदविला होता. त्यात रासळ संघाने बाजी मारली.

नेणवली कबड्डी स्पर्धेसाठी क्रीडाप्रेमींनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. या स्पर्धेचे अतिशय उत्कृष्ट नियोजन मंडळाच्यावतीने करण्यात आले होते. या स्पर्धेतील अंतिम लढत जय हनुमान रासळ विरुद्ध नाथभैरव झाप या संघात झाली. त्यात रासळ संघाने बाजी मारली. यावेळी विजेत्या रासळ संघाला १५ हजार रुपये रोख रक्कम व आकर्षक चषक देण्यात आले. तर, उपविजेता ठरलेल्या झाप या संघास १० हजार रुपये रोख रक्कम व आकर्षक चषक देण्यात आले. तसेच, तृतीय क्रमांक पटकावलेला मजरे जांभूळपाडा संघ आणि चतुर्थ क्रमांक पटकावलेला वावे या संघांना प्रत्येकी ७ हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. यावेळी सर्वोत्कृष्ट खेळाडू वैभव खाडे, सर्वोत्कृष्ट चढाई भाई साजेकर, उत्कृष्ट पक्कड कल्पेश देशमुख, पब्लिक हिरो प्रसाद हिर्डेकर यांना आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

## डब्लूपीएल जानेवारीत सुरू होण्याची शक्यता

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महिला प्रीमियर लीग २०२६ च्या वेळापत्रकाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. महिला प्रीमियर लीग २०२६ ची सुरुवात जानेवारी महिन्यात होणार असून, अंतिम सामना फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात खेळवला जाईल. तसेच, या आगामी हंगामासाठी दोन शहरांची निवडही करण्यात आली आहे.

महिला प्रीमियर लीग २०२६ चा हंगाम ७ जानेवारीपासून सुरू होणार असून ३ फेब्रुवारीला अंतिम सामना खेळवला जाणार आहे. तसेच, बीसीसीआयने या सामन्यांसाठी मुंबई आणि बडोदा या ठिकाणांची निवड केली आहे. त्यातील पहिला टप्पा नवी मुंबईतील डीवाय पाटील



स्टेडियममध्ये पडणार असून दुसरा टप्पा बडोद्यातील मैटानात पार पडणार आहे. याआधीचे तीनही हंगाम मार्च महिन्यात सुरू झाले होते. परंतु, यंदाचा हंगाम जानेवारीत खेळवला जाणार आहे. भारतात होणारा पुरूषांच्या आगामी टी-२० विश्वचषकामुळेच हे सामने जानेवारी ते फेब्रुवारी या कालावधीत खेळवले जाणार आहेत.

बीसीसीआयने अद्याप या प्रकरणाबाबत संघ मालकांशी कोणतीही माहिती शेअर केलेली नाही. सध्या अनौपचारिक पातळीवर चर्चा सुरू आहे. महिला प्रीमियर लीगच्या चौथ्या हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव २७ नोव्हेंबरला नवी दिल्लीत पार पडणार आहे. या कार्यक्रमादरम्यान अगामी हंगामाच्या वेळापत्रकाची अधिकृत घोषणा केली जाणार असल्याची माहिती मळित आहे. सामन्यांसाठी लखनौ, बेंगळुरू, मुंबई आणि बडोदा या ठिकाणांवर चर्चा झाली होती. त्यामुळे हंगामातील पहिला टप्पा तिथे होऊ शकतो. जर परिस्थिती सध्याच्या स्थितीत राहिली तर अंतिम सामना बडोद्यातील कोटाम्बी स्टेडियमवर खेळवला जाऊ शकतो. बडोदाचा पहिला टप्पा १६ जानेवारी रोजी सुरू होण्याची अपेक्षा आहे. कारण भारत विरुद्ध न्यूझीलंड एकदिवसीय मालिकेचा पहिला सामना त्याच ठिकाणी पाच दिवस आधी खेळवला जाणार आहे.

महिला प्रीमियर लीगचा पहिला हंगाम २०२३ मध्ये खेळला गेला होता. तयात मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपीटल्सला हरवून विजेतेपद पटकावले होते. २०२४ मध्ये आरसीबीने दिल्लीला पराभूत करत किताब जिंकला होता. तर, २०२५ मध्ये पुन्हा एकदा मुंबईने दिल्लीला हरवत विजेतेपद मळिवले होते. त्यामुळे दिल्लीला सलग तीन वेळा अंतिम सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे. आता आगामी हंगामात कोणत्या दोन संघांमध्ये अंतिम भिडत होईल, हे पाहणे खूप महत्त्वाचे असणार आहे.

## स्वराज्य स्पोर्टस उपांत्य फेरीत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई उपनगर कबड्डी असो. च्या मान्यतेने गजानन मंडळ व पार्ले महोत्सव स्पोर्टसब अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार पराग आळवणी, आयोजक मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा पार्ले येथील प्ले-ग्राउंडवर सुरु आहेत.

पूर्व विभाग महिलांच्या उपांत्यापूर्व फेरीत कांजूरच्या स्वराज्य स्पोर्टस भांडुपच्या शिवकन्या महिला संघाचा ३७-१० असा सहज पराभव केला. याशिका पुजारी, समृद्धी मोहिते यांच्या झंजावाती खेळाला या विजयाचे श्रेय जाते. याच विभागात उप उपांत्यापूर्व साम न्यात कुर्ल्याच्या विशाल स्पोर्टस्ने विक्रोळीच्या टागोरनगर मित्र



मंडळाचा २५-१३ असा पराभव केला तो प्रियंका विंगळे, स्वाती भोसले यांच्या चतुरस्त्र खेळाने. पश्चिम विभागात प्रथम श्रेणी पुरुष गटाच्या पहिल्या फेरीत यजमान पार्ले महोत्सव स्पोर्टसब अकॅडमीने बोरिवलीच्या ओमब साई मंडळाचा २९-१७ असा पाडाव केला. ईशान्त शिंदे, प्रशांत पवार विजयी संघाकडून उत्कृष्ट खेळले. दुसऱ्या सामन्यात कारंजावाडेच्या जय भवानीने नव तरुण मंडळावर २३-०६ अशी सहज मात केली. लोकेश निगडे, जितेश कदम यांनी चमकदार खेळ केला.

**अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा | वडाळ्यातील पटांगणावर आयोजन**

# शिवशक्ती, स्वामी समर्थ मंडळाची बाजी

**। मुंबई । क्रीडा प्रतिनिधी ।**

मुंबई शहर (पूर्व व पश्चिम विभाग) कबड्डी असो.ने द्रौपदी मारूती जाधव चषक जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले हेते. हे सामने वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर पार पडले. या स्पर्धेत कुमारी गटात शिवशक्ती महिला संघ आणि श्री स्वामी समर्थ मंडळाने बाजी मारली आहे. तर, किशोर गटात गुड मॉर्निग स्पोर्टस्आणि विजय क्लब यांनी जेतेपद पटाकवले आहे.

या स्पर्धेत पश्चिम विभागातील कुमारी गटाच्या अंतिम सामन्यात



शिवशक्ती महिला संघ-अ ने अमरहिंद मंडळाला ५५-२३ असे पराभूत करीत स्व. सौ. द्रौपदी मारूती जाधव चषक पटकविण्यात सातत्य राखले. त्यांनी आक्रमक सुरुवात करीत शिवशक्तीने पूर्वार्धात २४-१२ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात आपला खेळ अधिक गतिमान करीत गुणांचे अर्धशतक पार करीत आपला विजय सोपा केला. कुमारी गटाच्या पूर्व विभागातील अंतिम सामन्यात श्री स्वामी समर्थ मंडळाने शताब्दी स्पोर्टसब चा प्रतिकार २३-२० असा परतवून लावत स्व. दौपदी मारूती जाधव चषक पटकविला. विश्रांतीला आक्रमक सुरुवात करीत स्वामी समर्थने पहिल्या डावात १८-०९ अशी भक्कम आघाडी घेतली. त्यानंतर आहे ती आघाडी टिकविण्यावर भर देत सावध खेळ करीत सामना ३ गुणांच्या फरकाने आपल्या नावे केला.

पूर्व विभागात किशोरांच्या अंतिम सामन्यात गुड मॉर्निंगने शिवमुद्रा प्रतिष्ठानचा ५३-३७ असा पराभव करीत जेतेपदाला गवसणी घातली. कुमार गटानंतर त्यांचे हे दुसरे जेतेपद ठरले. पश्चिम विभागातील किशोरांच्या अंतिम सामन्यात विजय क्लबने गोलफादेवी सेवा संघाला ५५-३० असे सहज नमवीत विजेते पद मळिवले. कुमार गटात उपविजेते पदावर समाधान मानावे लागलेल्या विजय क्लबने किशोर गटाचे जेतेपद पटकवीत दुःख हलके केले.

## अस्मिता ॲथलेटिक्स लीग स्पर्धा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

केंद्र शासनाच्या ‘खेलो इंडिया’ उपक्रमांतर्गत भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि भारतीय ॲथलेटिक्स फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.१७) अस्मिता ॲथलेटिक्स लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा नवी मुंबई पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी रायगड जिल्ह्यातील सुमारे २०० हून अधिक मुला-मुलींनी विविध धावपट्टी आणि मैदानी स्पर्धांमध्ये सहभागी होऊन आपले कौशल्य दाखवले. या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक संघटनेचे उपाध्यक्ष व रायगड जिल्हा ॲथलेटिक संघटनेचे अध्यक्ष माजी आमदार बाळाराम पाटील,



ओलंपियन ललिता बाबर-भोसले, तसेच विजय चौधरी हे उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध वयोगटांतील १०० मीटर, २०० मीटर, ८०० मीटर धाव, लांब उडी, गोळाफेक, भाला फेक अशा अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षक, पालक आणि स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील म्हणाले की, अशा उपक्रमांमुळे तळागाळातील खेळाडू पुढे येतात. भविष्यात जिल्ह्यातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे अनेक खेळाडू घडतील, यावर माझा पूर्ण विश्वास आहे. तसेच, स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांचे, प्रशिक्षकांचे आणि स्वयंसेवकांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)